पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २०६ ■ सोमवार, दि. २ फेब्रुवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

Dr. Ravi V. Ganeshkar
M.B.B.S., M.S. (ENT)
Fellow Head & Neck Oncosurgery
फेलो हेड अँड नेक ओंकोसर्जरी
थायरॉइड सर्जरी आणि संबंधित थायरॉइड कॅन्सरचे विशेषज्ञ
मास्टर ऑफ सर्जरी, नाक, कान, गला संबंधित कर्करोग तज्ञ
Mob : 0721-2571357, 9326609901
Address: Gete Life Hospital, Near Maratha Friends, Vijay Colony, 19 No. School Beside, Rukhmini Nagar, Amravati

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार सातारा दौऱ्यावर

## दादांच्या पावलावर पाऊल; यशवंतराव चव्हाणांच्या स्मृतीस्थळी आदरांजली






प्रतिनिधी २ फेब्रुवारी

**सातारा:** राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राजकीय प्रवासात ज्या विचारांचे स्थान सर्वोच्च होते, तोच 'यशवंतराव चव्हाण' यांच्या विचारांचा वारसा आता त्यांच्या पत्नी आणि नवनिर्वाचित उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार पुढे चालवताना दिसत आहेत. उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर आज सुनेत्रा पवार यांचा पहिला दौरा सातारा जिल्ह्यातील कराड आणि फलटणला आहे. त्यांनी आज सकाळी १० वाजता कराडच्या प्रीतीसंगम येथे महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या समाधीचे दर्शन घेत, अभिवादन केले. त्यानंतर अजित पवारांचे पीएसओ विदीप जाधव यांच्या कुटुंबियांचीही भेट घेणार आहेत. यावेळी सुनेत्रा पवार यांच्यासोबत प्रीतिसंगमावर मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर, खासदार सुनील तटकरे, खासदार नितीन पाटील, माजी खासदार श्रीनिवास पाटील, माजी आमदार बाळासाहेब पाटील, जिल्हाधिकारी संतोष पाटील, पोलीस अधीक्षक तुषार दोशी, कराडचे नगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

अजित पवार यांच्या राजकीय आयुष्यात कराडचे प्रीतीसंगम आणि यशवंतराव चव्हाण यांची विचारधारा नेहमीच प्रेरणास्थान राहिली. महत्त्वाच्या राजकीय निर्णयांपूर्वी किंवा संकटाच्या काळात अजितदादांनी नेहमीच या समाधीस्थळी नतमस्तक होऊन ऊर्जा मिळवली होती. आपल्या भाषणांमधूनही ते 'चव्हाणसाहेबांची विचारसरणी' हाच आपला आधार असल्याचे सांगायचे. आज सुनेत्रा पवार यांनी आपल्या दौऱ्याची सुरुवात प्रीतीसंगमावरून करून, आपण दादांचा हा वैचारिक वारसा सक्षमपणे पुढे नेण्यास सज्ज आहोत, असाच संदेश दिला आहे. आज राज्याच्या उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रावहिनी पवार यांनी राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री आदरणीय अजितदादा पवार यांचे पीएसओ कै. विदीप जाधव यांच्या कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतली. यावेळी मा. उपमुख्यमंत्र्यांनी कै. विदीप जाधव यांना आदरांजली अर्पण करत, जाधव कुटुंबीयांशी आत्मीय संवाद साधला. अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यासाठी सुनेत्रा पवार यांनी ३१ जानेवारी रोजी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्या महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री ठरल्या आहेत. त्यांच्याकडे सध्या राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण आणि अल्पसंख्याक विकास या तीन महत्त्वाच्या खात्यांची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

# दोन्ही राष्ट्रवादींचे विलीनीकरण होणार !

## अजितदादांच्या निकटवर्तीयांचा मोठा दावा

प्रतिनिधी २ फेब्रुवारी

**बारामती :** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येण्याबाबत पुन्हा एकदा राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाल्या आहेत. अजित पवार यांच्या निधनानंतर पत्नी सुनेत्रा अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. यावरून विरोधकांनी टीका केली. राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येण्यावरून दोन्ही गटातील नेत्यांमध्ये अनेक दावे-प्रतिदावे करण्यात येत आहेत. शरद पवार यांनीही दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणावर भाष्य केले. यानंतर आता दिवंगत अजित पवार यांचे खास निकटवर्तीय असलेल्यांनी दोन्ही राष्ट्रवादींचे विलीनीकरण होणार असल्याचा दावा केला.राष्ट्रवादी एकत्र येण्याबाबतच्या चर्चेवर भाष्य करताना शरद पवार यांनी सांगितले की, चार महिन्यांपासून विलीनीकरणाबाबत सकारात्मक चर्चा सुरू होती. विलीनीकरणाची घोषणा १२ तारखेला होणार होती. या चर्चेचे नेतृत्व अजित पवार आणि जयंत पाटील करत होते. मात्र, अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे या प्रक्रियेला खंड पडला. या चर्चामध्ये मी प्रत्यक्ष सहभागी नव्हतो. अजितदादा, जयंत पाटील आणि शशिकांत शिंदे सातत्याने यात होते. दोन्ही पक्षांमध्ये एकत्र काम करण्याबाबत एकमत होते. दादांची इच्छा होती की, पक्ष एकत्र यावेत. ती इच्छा पूर्ण व्हावी, ही आमचीही इच्छा आहे, असे शरद पवार यांनी नमूद केले. यानंतर आता विद्या प्रतिष्ठानचे विश्वस्त आणि दिवंगत अजित पवारांचे निकटवर्तीय किरण गुजर म्हणाले, पुढील दहा ते अकरा दिवस पवार कुटुंब या विषयावर बोलणार नाही पण दोन्ही पक्षाचे विलीनीकरण होऊ शकते.

### गौतम अदानी शरद पवारांच्या भेटीला!

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर उद्योगपती गौतम अदानी यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांची मुंबईतील निवासस्थानी रविवारी संध्याकाळी भेट घेतली. सिल्व्हर ओक येथील पवारांच्या घरात दोघांमध्ये जवळपास ४५ मिनिटांहून अधिक काळ चर्चा झाली. अजित पवार यांच्या निधनाच्या पार्श्वभूमीवर ही सांत्वनपर भेट असल्याचे मानले जाते. परंतु या भेटीमुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांमधील संभाव्य राजकीय विलीनीकरणाच्या चर्चांना आणखी बळ मिळाले आहे.

# एकाच दिवसात वेगवेगळ्या भागातून सात जण गायब

प्रतिनिधी २ फेब्रुवारी

**बुलडाणा :** मलकापूर शहरातील हनुमान नगर परिसरातून एका उच्चभ्रू परिवारातील तीन जण संशयास्पदरीत्या अचानक बेपत्ता झाल्याने खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे बुलडाणा जिल्ह्यातील वेगवेगळ्या भागातून दिवसभरात सात जण गायब झाले आहेत.

मलकापूर शहरातील वसंत कुमार पटेल यांनी मलकापूर शहर पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रारीनुसार त्यांची पत्नी मित्तल पटेल, मुलगी सिया पटेल व मुलगा देवांश पटेल हे बाजारपेठेत गेले होते, मात्र बराच वेळ होऊनही ते परत न आल्याने ते रहस्यमयरीत्या बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदविण्यात आली आहे. मलकापूर शहरातील उच्चभ्रू परिवारातील तीन सदस्य अचानक बेपत्ता झाल्याने शहरात खळबळ उडाली आहे. तर बुलढाणा जिल्ह्यातील वेगवेगळ्या भागातून एकाच दिवसात पटेल परिवाराच्या सदस्यासह एकूण सात जण बेपत्ता झाल्याच्या तक्रारी पोलिसांना विविध पोलीस स्थानकात प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे बुलढाणा जिल्ह्यातील व्यक्तींच अचानक बेपत्ता होण्याचे प्रमाण वाढले आहे.

# पाकिस्तानचा भारताबरोबर टी २० सामना खेळण्यास विरोध!

**नवी दिल्ली :** टी २० वर्ल्ड कप २०२६ सुरू होण्यास आता अवघे काही दिवस उरले आहेत. मात्र त्याच्या ६ दिवस आधीच पाकिस्तानी क्रिकेट बोर्डाने नवा गोंधळ घालण्यास सुरूवात केली आहे. विश्वचषकात सहभागी होण्याचा निर्णय जवळपास एक आठवडा लांबणीवर टाकणाऱ्या पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने (पीसीबी) भारताविरुद्धच्या सामन्यावर बहिष्कार टाकण्याची घोषणा केली आहे. पाकिस्तान सरकारच्या आदेशाचा हवाला देत, पीसीबीने असं जाहीर केलं की ते टी२० वर्ल्ड कप २०२६मध्ये तर सहभागी होतील परंतु १५ फेब्रुवारी रोजी भारताविरुद्धचा सामना खेळणार नाहीत.

# अकोला जिल्ह्यात बिबटे का आहे असुरक्षित!

प्रतिनिधी २ फेब्रुवारी

**अकोला:** वन्य जीव रस्त्यावर तडफडून मरत असेल तर वन विभाग काय करत आहे. असा प्रश्न आपसूक निर्माण होत आहे. बाळापूर ते वाडेगाव रोडवर अज्ञात वाहनाच्या धडकेत बिबट ठार झाल्याची धक्कादायक घटनासमोर आली असून याला जबाबदार कोण असा प्रश्न उपस्थित होत आहे.

बाळापूर ते वाडेगाव मार्गावर अज्ञात वाहनाच्या धडकेत बिबट ठार झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. वन्य जीव अधिवास सोडून बाहेर येत असताना वन्य जीव विभाग, वन विभागाचे दूर्लक्ष का असा प्रश्न विचारला जात आहे. कोट्यावधी रुपये वन्यजीवाच्या संरक्षणाची खर्च होत असताना बिबट वाचविण्याकडे दूर्लक्ष असल्याचे चित्र आहे. आज सकाळी अपघातात बिबट ठार झाला अकोला वनविभागास माहिती मिळालयावर ताबडतोब , सहायक वनसंरक्षक पवन जाधव व आर एफ ओ विश्वास थोरात यांच्या आदेशानुसार व उपवन संरक्षक सुमंत सोळंके यांच्या मार्गदर्शनानुसार वनपाल गजानन गायकवाड , मानद वन्यजिव रक्षक बाळ काळणे , वनरक्षक एन एन सावळे, वनरक्षक राम काकडे, यशपाल इंगोले, तुषार अवारे हे घटनास्थळी पोहोचले. मृत बिबट ही मादी दोन ते अडीच वर्ष वयाची असावी. ह्या अगोदर बिबट दिसल्याचे समजले होते .

# 'डीआरआय'चा 'धडाका' अमरावतीत पाच कोटीचे एमडी ड्रग्ज जप्त !

प्रतिनिधी २ फेब्रुवारी

**अमरावती :** अमरावती शहराला ड्रग्जने विळखा घातल्याचे भीषण वास्तव समोर आले आहे. महसूल गुप्तवार्ता संचालनालय अर्थात 'डीआरआय'ने अमरावतीत धडक कारवाई करीत तब्बल ४ किलो ९०० ग्रॅम एमडी (मेफेड्रॉन) जप्त केले. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत या ड्रग्जची किंमत पाच कोटी रुपयांच्या घरात आहे. या कारवाईमुळे विदर्भातील ड्रग्ज रॅकेटचे धाबे दणाणले आहे. १ फेब्रुवारी रोजी ही कारवाई करण्यात आली. सकाळी ११ पासून सुरू झालेली ती कारवाई उशिरा रात्रीपर्यंत सुरू होती.




वर्धा जिल्ह्यातील कारंजा घाडगे येथील १९२ कोटींच्या कारवाईनंतर डीआरआयने आपला मोर्चा आता अमरावतीकडे वळवला आहे. विशेष म्हणजे, ही कारवाई गोपनीय पद्धतीने

अमरावतीच्या याच जीएसटी भवनात डीआरआयचे पथक रविवारी तळ ठोकून होते. अचानक आलेल्या वाहनांच्या ताफ्यामुळे घडामोडी वाढल्या.

करण्यात आली. स्थानिक गाडगेनगर पोलिस, गुन्हे शाखा आणि अँटी नार्कोटिक्स पथकालाही याचा पत्ता लागू दिला नाही. डीआरआयच्या पथकाने रविवार दुपारपासून नवसारी येथील जीएसटी भवनमध्ये तळ ठोकला असून तीन ते चार संशयितांची कसून चौकशी सुरू आहे.

# संजय राऊतांच्या शंकेने राजकारणात खळबळ

प्रतिनिधी २ फेब्रुवारी

**मुंबई :** राज्याचे दिवंगत माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातावर राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरींनी ('स्‍दत् शर्ङ्ग्) मोठी शंका उपस्थित केलीय. विमान अपघातावेळी 'तिथं धुकं नव्हतं तर धोका होता', त्यामुळं अजित दादांचा १०० टक्के घात झाल्याचे ते म्हणाले. आता यानंतर शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी या प्रकरणावरून गंभीर शंका उपस्थित केली आहे.

संजय राऊत यांनी माध्यमांशी संवाद साधताना विविध मुद्द्यांवर भाष्य केली. पियुष गोयल यांनी राष्ट्रवादीचे अध्यक्ष प्रफुल्ल पटेल झाल्याचा दावा केला. मात्र त्यानंतर काही वेळात त्यांनी आपल्या वक्तव्यावरील यु-टर्न घेतला. याबाबत विचारले असता संजय राऊत म्हणाले की, अजित दादांचा पक्ष हा आता पवार, पाटलांचा पक्ष राहिलेला नाही. तो आता गोयल, पटेल, पारेख, शाह, मोदी यांचा पक्ष होण्याची शक्यता आहे. अजित पवारांचा पक्ष हा अस्सल मराठमोळ्या चेहरांचा पक्ष होता. सुरुवातीला अजितदादांचा पक्ष हा शाहांचा पक्ष होता. आता तो पटेल यांचा पक्ष होईल आणि महाराष्ट्रातील एक प्रादेशिक अस्मिता जपणारा पक्ष भारतीय जनता पक्षाने गिळून टाकला आहे.

अजित पवार यांनी कधीही भारतीय जनता पक्षाच्या अजेंड्यावर काम केले नाही. सत्तेसाठी ते एकत्र आले. त्यांच्यावर भाजपने काही संकटं लादली.

# आज सायंकाळी महापौर व उपमहापौर यांचा पदग्रहण सोहळा

प्रतिनिधी २ फेब्रुवारी

**अकोला:** आज सायंकाळी ५ वाजता महापौर शारदा खेडकर आणि उपमहापौर अमोल गोरे यांचा पदग्रहण सोहळा होणार आहे. भाजपा प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे, आमदार वसंत खंडेलवाल, महानगर अध्यक्ष जयंत मसने, माजी महापौर विजय अग्रवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत मनपा सभागृहात कार्यक्रम होणार आहे. अकोला महानगरातील सर्व पदाधिकारी, मंडळ अध्यक्ष, मोर्चा, सेल अध्यक्ष, नगरसेवक, शक्तीकेंद्र प्रमुख, बुथप्रमुख यांनी उपस्थित राहावे असे आवाहन भाजपच्या वतीने केले आहे.

# संतनगरी श्रींच्या 148 व्या प्रगट दिन उत्सवासाठी सज्ज

## राज्यभरातून भजनी दिंड्यांचे आगमन

प्रतिनिधी २ फेब्रुवारी

**शेगाव :** संत गजानन महाराज संस्थानच्या वतीने श्रींचा १४८ वा प्रगट दिन उत्सव २ ते ९ फेब्रुवारी दरम्यान भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने श्रींच्या मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये सकाळी ६ ते ६.४५ काकडा, सकाळी ७.१५ ते ९.१५ भजन, दुपारी ४ ते ५ प्रवचन, सायंकाळी ५.३० ते ६ हरिपाठ व रात्री ८ ते १० पर्यंत श्रीहरी कीर्तन होत आहे.

श्री गजानन महाराज संस्थान मध्ये सोमवार पासून श्री गजानन महाराजांच्या १४८ वा प्रगट दिन सोहळ्याला सुरुवात झाली. महारुद्र स्वाहाकार यागामुळे श्रींच्या मंदिरातील वातावरण भक्तिमय व चैतन्यमय वातावरण निर्मिती झाली. रविवार ८ फेब्रुवारीला श्रींच्या प्रगटदिन दिनी सकाळी १० वाजता यागाची पुर्णाहूती व अवभृतस्नान होईल. दुपारी उत्सवाची पालखी परिक्रमा निघेल. श्रींचा नामजप आणि कीर्तनामुळे वारकरी, भाविक भक्तिरसात न्याहून निघत आहे. श्रींच्या प्रगट दिन सोहळ्यानिमित्त महाराष्ट्र, मध्य प्रदेश व राज्याच्या विविध भागातून भजनी दिंड्या संतनगरीत दाखल होत आहे.' श्री गजानन अवलिया अवतरले जग ताराया.. अणु रेणू मध्ये ब्रह्म व्यापले लय उत्पत्ती समान माघ वद्य पुण्य दिवशी प्रगटला योगी महान.. या अभंगाचे गायन करीत ज्ञानोबा माऊली तुकाराम यांचा व गण गण गणात बोते मंत्राचा नाम जप करीत भजनी दिंड्या शेगावात दाखल होत आहेत.

***'नामस्मरण गजाननाचे गण गण गणात बोते अखंड चिंतन गजाननाचे गण गण गणात बोते'***

मंत्राचा नामजप करीत श्रींच्या दर्शनासाठी वारकऱ्यांची मांदियाळी संत नगरीत पाहायला मिळत आहे.संतनगरी शेगावात श्रींच्या १४८ वा प्रगट दिन उत्सव' गण गण गणात बोते 'जय गजानन श्री गजानन चा नाम घोषात भक्तिमय वातावरणात



साजरा होणार आहे. त्यानिमित्त संतनगरी शेगावला राज्यभरातील विविध भागातील भजनी दिंड्या दररोज येत असून श्रींचे दर्शन व महाप्रसाद घेऊन वारकरी परतत आहेत. श्री संस्थान तर्फे भजनी दिंडी मधील वारकरी यांचा यथोचित सन्मान केला जातो व श्रींचे दर्शन घेऊन दिंडीतील वारकरी आपापल्या गावी परत जात आहेत. शेगावात



भजनी दिंड्यांचे आगमन होत असल्यामुळे टाळ मृदंगाच्या गजराने व गण गण गणात बोते गुरु गजानन नमो नमः। माऊली ओ माऊली गुरु गजानन माऊली मंत्र जाप व भक्तिमय वातावरणाने संत नगरी मधील रस्ते भक्तिरसात दुमदुमून जात आहेत व भाविक व वारकरी यांना प्रगट दिनाची ओढ लागली आहे. श्रींच्या मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. मंदिर परिसरात केळीचे खांब, व आंब्याच्या पानाची तोरणे लावण्यात येऊन भक्तीमय वातावरण असून श्रींच्या नाम घोषात भक्त तल्लीन होत. श्रींच्या प्रगट दिन उत्सवात सहभागी होत आहेत.

# दोन गाड्यांना अज्ञात व्यक्तीने लावली आग!

प्रतिनिधी २ फेब्रुवारी

**कारंजा :** स्थानिक तुषार कॉलनी, दारव्हा रोड येथे उभ्या असलेल्या स्विफ्ट डिझायर व मारूती एस-प्रेसो लोगो या दोन गाड्यांना २ फेब्रुवारीच्या रात्री २.२० वाजताच्या सुमारास आग लावली. यामध्ये या दोन्ही गाड्यांचे मोठे नुकसान झाले असल्याचे कार मालकाचे म्हणणे आहे.

कारंजा ते दारव्हा रोडवर स्विफ्ट डिझायर एम.एच.३७ एडी. ०८९२ कार व मारुती एस-प्रेसो लोगो एम.एच.२९ सी.जे.१९२५ ला भीषण आग लागली. ह्या दोन्ही गाड्या कार्तिक सुरसे आणि गणेश गुडापे रा. दारव्हा रोड तुषार कॉलनी यांच्या मालकीच्या असून अज्ञात व्यक्तीने



गाडी पेटल्याची माहिती गाडी मालकाने अग्निशमन दल यांना दिली. क्षणाचाही विलंब न लावता अग्निशमन दलाची गाडी घटनास्थळी पोहोचली. तसेच अग्निशमन अधिकारी विवेक वळसे, चालक मुलचंद राठोड, फायरमन सचिन ठाकूर शुभम झोपाटे, अनुराग बारबोले, इमरान खान, सागर पांडे, सोहेल अहेमद यांनी पेटलेल्या दोन्ही कारची आग विझवली. त्यामुळे पुढील अनर्थ टळला.

CMYK CMYK

सिटी न्यूज अमरावती

सोमवार, दि. २ फेब्रुवारी २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

## रुग्णालयात आपत्कालीन सेवांचा विस्तार, शहराला मिळणार विशेष विकास निधी

**अमरावती :** अर्थसंकल्पात पाच लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांसाठी विशेष विकास निधीची तरतूद करण्यात आली आहे. या निधीतून रुग्णालयातील आपत्कालीन सेवांचा विस्तार करण्यात येणार असून नागरिकांना आरोग्याच्या अधिक चांगल्या सुविधा मिळणार आहेत.

या अर्थसंकल्पात अमरावती शहरासाठी कोणतीही नवीन योजना जाहीर करण्यात आलेली नसली, तरी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांतून विकासकामांना गती देण्यावर भर देण्यात आला आहे. आरोग्य, शिक्षण, रोजगार, उद्योग, तसेच लघुउद्योग क्षेत्रात सुधारणा करण्याचा उद्देश असल्याचे सांगण्यात आले. आमदारांकडून अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया देताना सांगण्यात आले की, रुग्णालयांमधील आपत्कालीन सेवा बळकट झाल्यास सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळेल. तसेच शहरातील पायाभूत सुविधांचा विकास, वाहतूक व्यवस्था, पर्यटन विकास आणि रोजगारनिर्मितीला चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# अजितदादा पवार यांचा अस्थिकलश घेऊन आ. संजय खोडके अमरावती येथे पोहोचणार

## ◆ रेल्वेस्टेशन चौक स्थित जनसंपर्क कार्यालयात दादांचा अस्थिकलश दर्शनासाठी राहणार खुला

प्रतिनिधी २ फेब्रुवारी




**अमरावती:** आज मुंबईतील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पक्ष कार्यालयात राष्ट्रवादी परिवाराने पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अस्थिकलशाचे पूजन केले. यावेळी दादांच्या पवित्र स्मृतींचे स्मरण करत, भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली.

दिवंगत अजितदादा पवार यांच्या अस्थिकलशाचे दर्शन करता यावे म्हणून राज्यभरात त्यांचा अस्थिकलश नेण्यात येणार आहे.

अमरावती विभागातील पाच जिल्हे व एक वर्धा जिल्ह्यासाठी स्व.अजितदादा पवार यांचा अस्थिकलश घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे महासचिव (संघटन ) आ.संजय खोडके आज सोमवारी दिनांक २ फेब्रुवारी २०२६ रोजी अमरावती येथे पोहोचणार असून रेल्वे स्टेशन चौक स्थित जनसंपर्क कार्यालय येथून प्रत्येक जिल्ह्याचा अस्थिकलश हे त्या -त्या जिल्ह्याच्या अध्यक्षांकडे सुपूर्द करणार आहे. तर अमरावती जिल्ह्यासाठी अजितदादा पवार यांचा अस्थिकलश आमदार - सुलभाताई खोडके यांच्या रेल्वे स्टेशन चौक स्थित जनसंपर्क कार्यालय येथे राष्ट्रवादी परिवार, सर्वपक्षीय कार्यकर्ते तसेच सर्व जनतेला दर्शनासाठी खुला राहणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांचे गेल्या बुधवारी २८ जानेवारी २०२६ रोजी विमान अपघातात दुःखद निधन झाले. त्यानंतर त्यांचेवर बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या प्रांगणात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. अजितदादा पवार यांच्या अकाली निघून जाण्याने राष्ट्रवादी परिवारात शोक व्यक्त होत आहे.

मुंबई येथील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यालयात आज दिनांक १ फेब्रुवारी रोजी दिवंगत अजितदादा पवार यांच्या अस्थिकलशाचे पूजन, त्यांच्या पवित्र स्मृतींचे स्मरण करीत भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर आता अजितदादांचा अस्थिकलश राज्यभरात नेण्यात येणार आहे.

अमरावती विभागातील पाच जिल्हे आणि एक वर्धा जिल्हा अशा सहा जिल्ह्यांमध्ये स्व.अजितदादा पवार यांचा अस्थिकलश दर्शनासाठी रवाना करण्याची जबाबदारी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे महासचिव (संघटन ) आ.संजय खोडके यांच्यावर असून ते आज सोमवार दिनांक २ फेब्रुवारी २०२६ रोजी अमरावती येथील रेल्वे स्टेशन चौक स्थित आ.सौ.सुलभाताई खोडके यांचे जनसंपर्क कार्यालय येथे दुपारी २ वाजता अस्थिकलश घेऊन पोहोचणार आहे.

तेथे विभागातील अकोला, यवतमाळ, वाशीम, बुलढाणा आणि एक वर्धा येथील जिल्हाध्यक्षांना दिवंगत अजितदादा पवार यांचा अस्थिकलश सुपूर्द करतील. त्यानंतर ते सर्व जिल्हाध्यक्ष हे आपापल्या जिल्ह्यात अजितदादा पवार यांच्या अस्थिकलशाचे दर्शन करता यावे म्हणून त्या-त्या जिल्ह्याचा अस्थिकलश घेऊन रवाना होतील.

तर अमरावती जिल्ह्यासाठीचा दिवंगत लोकनेता अजितदादा पवार यांचा अस्थिकलश हा आ.सौ.सुलभाताई खोडके यांचे जनसंपर्क कार्यालय अमरावती येथेच राहणार असून दुपारी २ वाजता पासून ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत अमरावती जिल्ह्यातील राष्ट्रवादी परिवार, सर्वपक्षीय कार्यकर्ते व नागरिकांसाठी अस्थिकलश सर्वांना दर्शनासाठी खुला राहणार आहे.

त्यानंतर दुसऱ्या दिवशी मंगळवारी पहाटेच्या सुमारास गुरुकुंज मोझरी येथील पवित्र कुंडात श्री. गुरुदेव मंडळाच्या परंपरेनुसार दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या पवित्र अस्थिकलशाचे विधिवत विसर्जन करण्यात येईल. अशी माहिती महासचिव (संघटन ) आ.संजय खोडके यांनी दिली आहे.

## विदर्भ साहित्य संघाच्या निवडणुकीत गोंधळ; मतपत्रिका गहाळ झाल्याने साहित्यिकांमध्ये अस्वस्थता

प्रतिनिधी २ फेब्रुवारी

**अमरावती :** विदर्भ साहित्य संघाच्या निवडणूक प्रक्रियेत गंभीर प्रकार समोर आला असून, काही मतदारांच्या मतपत्रिका गहाळ झाल्याने साहित्यिक व सभासदांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. या प्रकरणामुळे निवडणुकीच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, स्थानिक साहित्यिकांनी याची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. निवडणुकीसाठी पाठवण्यात आलेल्या मतपत्रिका काही सभासदांना प्राप्त न झाल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. काही मतदारांनी वेळेत मतपत्रिका न मिळाल्याने मतदानाचा हक्क बजावता न आल्याचे सांगितले आहे. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेत त्रुटी असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर स्थानिक साहित्यिकांनी निवडणूक अधिकाऱ्यांकडे लेखी निवेदन सादर करून स्वतंत्र चौकशी समिती नेमण्याची मागणी केली आहे. मतपत्रिका नेमक्या कशा आणि कुठे गहाळ झाल्या, याची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. विदर्भ साहित्य संघ ही साहित्यिकांची महत्त्वाची संस्था असल्याने तिच्या निवडणुका पारदर्शक आणि विश्वासार्ह पद्धतीने होणे आवश्यक असल्याचे मत साहित्यिकांनी व्यक्त केले आहे. अशा प्रकारांमुळे संस्थेच्या प्रतिमेला धक्का बसू शकतो, अशीही चिंता व्यक्त होत आहे.

दरम्यान, निवडणूक अधिकाऱ्यांनी या तक्रारींची दखल घेतली असून, प्रकरणाची माहिती घेण्यात येत असल्याचे सांगितले आहे.

## मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयात स्कूल कनेक्ट अभियानाचे यशस्वी आयोजन

प्रतिनिधी २ फेब्रुवारी



**अमरावती :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० जनजागृती अभियानाचा एक भाग म्हणून, मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय, अमरावती येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षांतर्गत (IQAC) इंग्रजी विभागाने अलीकडेच श्री. शिवाजी हायस्कूल, भानखेड़ा (बुद्रुक), जि. अमरावती येथे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० बद्दल जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने 'स्कूल कनेक्ट' अभियानाचे आयोजन केले.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. पंजाबराव देशमुख यांना पुष्पहार अर्पण करून आणि स्वागत समारंभाने झाली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक सतीश पाटील यांचे शाल, श्रीफळ, भेटवस्तू आणि रोपे देऊन स्वागत व सत्कार करण्यात आला, तसेच उपस्थित सर्व शिक्षकांचे महाविद्यालयाच्या वतीने प्रा. डॉ. सविता दिनकर ठाकरे यांनी स्वागत केले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० बद्दल जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने, डॉ. सविता डी. ठाकरे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० म्हणजे काय, त्याची गरज, या धोरणांतर्गत विद्यार्थ्यांना विषय निवडीसाठी उपलब्ध असलेल्या विविध संधी आणि भविष्यात विविध क्षेत्रांमध्ये व्यक्तिमत्त्व विकासासाठी विद्यार्थ्यांनी कोणती कौशल्ये आत्मसात केली पाहिजेत, याबद्दल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांसाठी एक संवाद सत्राचेही आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० बद्दल प्रश्न विचारले आणि त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. डॉ. ठाकरे यांनी विद्यार्थ्यांना अत्यंत सोप्या आणि सहज समजेल अशा भाषेत मार्गदर्शन केले.

व्याख्यानानंतर, विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी अभिप्राय सत्राचेही आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी आपले विचार व्यक्त केले आणि शिक्षकांनीही आपली मते मांडली. या भेटीदरम्यान डॉ. ठाकरे यांनी विद्यार्थ्यांना चॉकलेट आणि पेन वाटप केले. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला आणि विद्यार्थ्यांनी भविष्यातही असेच मार्गदर्शन मिळत राहील, अशी आशा शिक्षकांनी व्यक्त केली. मुख्याध्यापक पाटील यांनी आपल्या भाषणात वक्त्यांचा परिचय करून दिला आणि भविष्यात अशा जनजागृती कार्यक्रमांची गरज असल्याचे अधोरेखित केले. मानवी मूल्यांची शिकवण देणाऱ्या एका सुंदर प्रार्थना गीताने कार्यक्रमाची सांगता झाली. इंग्रजी विभागाच्या कु. प्रीती जवंजाळ आणि महाविद्यालयाचे विद्यार्थीही यावेळी उपस्थित होते आणि त्यांनी कॅम्पस टूर आयोजित केली. शाळेचे मुख्याध्यापक श्री. पाटील, शिक्षक श्री. वरहाडे, श्री. राजूरकर, श्रीमती राऊत, कुमारी जया ठाकरे आणि इतर कर्मचाऱ्यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आपले सहकार्य दिले.

## नफा वसुलीचा फटका: चांदी तीन दिवसांत १.६० लाखांनी घसरली, २.४१ लाख प्रति किलो; सोनेही १.४० लाखांवर

प्रतिनिधी २ फेब्रुवारी

**अमरावती :** मौल्यवान धातूंच्या बाजारात गेल्या काही दिवसांपासून मोठी चढ-उताराची स्थिती पाहायला मिळत असून, नफावसुलीमुळे चांदीच्या किमतीत तीव्र घसरण झाली आहे. अवघ्या तीन दिवसांत चांदीची किंमत तब्बल १.६० लाखांनी कमी झाली असून सध्या चांदीचा दर २.४१ लाख प्रतिकिलोवर आला आहे. याच काळात सोन्याच्या किमतीही दबावाखाली असून सोने सुमारे १.४० लाखांच्या पातळीवर व्यवहार करत आहे.

बाजारातील तज्ज्ञांच्या मते, गेल्या काही आठवड्यांत सोने आणि चांदीच्या किमतींमध्ये मोठी वाढ झाल्यानंतर गुंतवणूकदारांनी नफावसुलीला सुरुवात केली. याच नफावसुलीचा थेट परिणाम चांदीच्या किमतींवर दिसून येत आहे. चांदीच्या दरात एकाच वेळी मोठी घसरण झाल्याने सराफा बाजारात चर्चेला उधाण आले आहे.

आंतरराष्ट्रीय बाजारातील संकेतांचाही देशांतर्गत बाजारावर परिणाम होत आहे. जागतिक स्तरावर व्याजदरांबाबत असलेली अनिश्चितता, डॉलर निर्देशांकातील चढ-उतार आणि कमोडिटी बाजारातील दबाव यामुळे मौल्यवान धातूंवर परिणाम होत आहे. याशिवाय औद्योगिक मागणीत काही प्रमाणात घट झाल्यानेही चांदीच्या किमतींवर दबाव वाढल्याचे तज्ज्ञ सांगतात.

सोनेही या घसरणीपासून अलिप्त राहिलेले नाही. सोन्याचे दर सध्या ?१.४० लाखांच्या आसपास स्थिरावले असले, तरी गुंतवणूकदार सावध भूमिका घेत असल्याचे चित्र आहे. आगामी काळात जागतिक घडामोडी, अमेरिकेच्या आर्थिक धोरणांवरील निर्णय आणि महागाईविषयक आकडेवारी यावर सोन्या-चांदीच्या किमतींची दिशा अवलंबून राहणार आहे.

सराफा बाजारातील व्यावसायिकांच्या मते, सणासुदीचा हंगाम आणि लग्नसराई जवळ येत असल्याने प्रत्यक्ष खरेदीला काही प्रमाणात चालना मिळू शकते. मात्र, सध्या किमतींतील अस्थिरतेमुळे ग्राहक आणि गुंतवणूकदार दोघेही प्रतीक्षा करण्याच्या भूमिकेत आहेत. किमती आणखी घसरण्याची शक्यता लक्षात घेऊन अनेकजण खरेदी पुढे ढकलत असल्याचेही दिसून येते.

तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, दीर्घकालीन गुंतवणुकीच्या दृष्टीने सोने आणि चांदी अजूनही सुरक्षित पर्याय मानले जातात. मात्र, अल्पकालीन गुंतवणूकदारांनी बाजारातील चढ-उतार लक्षात घेऊन सावधगिरीने निर्णय घ्यावा, असा सल्ला देण्यात येत आहे.

एकूणच, नफावसुली आणि जागतिक घडामोडींच्या पार्श्वभूमीवर चांदी आणि सोन्याच्या किमतींमध्ये घसरण दिसून येत असून, पुढील काही दिवस बाजारासाठी महत्त्वाचे ठरणार आहेत.

## 'संस्कार भारती' भारताला नवजीवन देणारी चळवळ - कांचन गडकरी

प्रतिनिधी २ फेब्रुवारी

### ♦ अचलपूर समितीचा रौप्य महोत्सव उत्साहात



**अचलपूर :** भारतीय संस्कृती, कला आणि मूल्यांची जपणूक करणारी 'संस्कार भारती' ही भारताला नवजीवन देणारी चळवळ आहे, असे प्रतिपादन कांचन गडकरी यांनी केले. त्या संस्कार भारती अचलपूर समितीच्या रौप्य महोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या.

यावेळी त्यांनी संस्कार भारतीच्या कार्याचा आढावा घेत, कला, साहित्य आणि संस्कृतीच्या माध्यमातून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्याचे कार्य ही संस्था सातत्याने करीत असल्याचे सांगितले. भारतीय परंपरा, संस्कार आणि राष्ट्रीय जाणीव जपण्यासाठी अशा चळवळींची आज नितांत गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

रौप्य महोत्सवानिमित्त आयोजित या कार्यक्रमात विविध सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी संस्कार भारती अचलपूर समितीचे पदाधिकारी, सदस्य तसेच कला-संस्कृतीप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

## रस्ते अपघातात तातडीने मदत पोहोचवावी-जिल्हाधिकारी आशिष येरेकर

प्रतिनिधी २ फेब्रुवारी



**अमरावती :** रस्ते अपघातातील जखमींना तातडीने उपचार मिळावा, यासाठी कॅशलेस सुविधा देण्यात येणार आहे. यासाठी जिल्ह्यातील अपघाताचे ठिकाण शोधून त्याठिकाणचे रूग्णालय यात अंगीकृत करावे, तसेच रस्ते अपघातात तातडीने मदत पोहोचवावी, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज रस्ते सुरक्षा समितीची सभा पार पडली. यावेळी प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार, कार्यकारी अभियंता प्रतिक गिरी आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी येरेकर यांनी, अपघात रोखण्यासाठी गतीरोधक बसविताना शास्त्रोक्त पद्धतीने बसविण्यात यावी. यामुळे वाहनांचे संतुलन बिघडून अपघात घडू नये, याची काळजी घ्यावी. गती कमी करण्यासाठी स्ट्रीप्स बसविण्यात येतात. यामुळे वाहनांवरील नियंत्रण होत नसल्याने अपघात होत आहेत. त्यामुळे गतीरोधकाची कामे करताना तांत्रिक बाबी तपासून कामे करण्यात यावी. यासोबतच अपघाताची ठिकाणे शोधून त्याठिकाणी उपाययोजना करण्यात यावी.

राज्य किंवा राष्ट्रीय महामार्गाला पोहोच असणाऱ्या रस्त्यांवर गतीरोधक बसविण्यात यावे. त्यामुळे या मार्गावरून येणाऱ्या वाहनांची गती कमी होण्यास मदत मिळेल. तसेच बसेस थांबविण्यासाठी योग्य जागा शोधून त्याठिकाणी थांबविण्यात याव्यात. मोर्शी येथे रस्त्यावरील अतिक्रमणामुळे वाहतुकीस अडचण होत असल्याने ही अतिक्रमणे तात्काळ काढण्यात यावीत. शिंगणापूर येथील हायमास्टचे काम तातडीने करण्यात यावे. तसेच अपघाताची माहिती पोर्टलवर तातडीने भरण्यात यावी. रस्ता सुरक्षा अभियाना नागरिकांमध्ये जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबविण्यात यावे, अशा सूचनाही जिल्हाधिकारी यांनी केली.

## नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

**अमरावती :** भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक श्रेष्ठ क्रांतिकारक नेते व आझाद हिंद सेनेचे सरसेनापती नेताजी सुभाषचंद्र बोस आणि प्रसिद्ध व्यंगचित्रकार बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात आज निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण अभिवादन केले.

उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर घ्यार यांच्यासह अन्य अधिकारी कर्मचारी यावेळी उपस्थित होते. उपस्थितांनीही नेताजी सुभाषचंद्र बोस आणि स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

## अर्थसंकल्प संदर्भात प्रतिक्रिया

देशाचा २०२६ चा केंद्रीय अर्थसंकल्प आज संसदेत सादर करण्यात आला असून हा अर्थसंकल्प समावेशक विकास, आर्थिक स्थैर्य आणि भविष्यातील भारताची मजबूत पायाभरणी करणारा असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. शेतकरी, कामगार, मध्यमवर्ग, महिला, युवक तसेच उद्योजक यांना केंद्रस्थानी ठेवून करण्यात आलेल्या तरतुदी देशाच्या सर्वांगीण प्रगतीस पूरक ठरणार आहेत. पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य, डिजिटल अर्थव्यवस्था, रोजगारनिर्मिती आणि स्टार्टअप्सना चालना देणाऱ्या घोषणांमुळे अर्थव्यवस्थेला नवे बळ मिळणार आहे. ग्रामीण आणि शहरी भागातील विकासाचा समतोल राखण्याचा प्रयत्न या अर्थसंकल्पातून दिसून येतो. वित्तीय शिस्त जपत विकासाला गती देणारा हा अर्थसंकल्प आत्मनिर्भर भारताच्या संकल्पनेला अधिक मजबूत करणारा आहे.

एकूणच, देशाच्या दीर्घकालीन हिताचा विचार करून सादर करण्यात आलेला हा अर्थसंकल्प सकारात्मक, दूरदृष्टीपूर्ण आणि विकासाभिमुख असल्याची भावना जनतेमध्ये निर्माण करतो.



**सुनील खराटे**
भाजप, अमरावती

## अमेरिकेच्या वर्चस्वाला दुसरे देश आव्हान देऊ शकतात का?

आर्थिक, लष्करी आणि वैज्ञानिक शक्तीचा जागतिक तुलनात्मक अभ्यास केला असता जगात आज एकच नाव सर्वाधिक प्रभावी मानले जाते – अमेरिका. डॉलरपासून ते ड्रोनपर्यंत, सिलिकॉन व्हॅलीपासून ते नाटो पर्यंत – अमेरिका जागतिक व्यवस्थेच्या केंद्रस्थानी आहे. पण हा प्रभाव कायम राहील का? चीन, रशिया, युरोपियन युनियन, भारत यांसारखे देश अमेरिकेच्या वर्चस्वाला खरेच आव्हान देऊ शकतात का? चला तीन मुख्य क्षेत्रांतून याचा अभ्यास करून अर्थव्यवस्था, लष्करी ताकद आणि विज्ञान-तंत्रज्ञान या तीन महत्वपूर्ण कसोट्यांवर कोण श्रेष्ठ आहे याचा विचार करून पाहू.

**१. अर्थव्यवस्था – डॉलर विरुद्ध ड्रॅगन**

अमेरिका आजही जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे. डॉलर हे जागतिक चलन आहे. तेलापासून सोन्यापर्यंत सगळे व्यवहार डॉलरमध्ये होतात. आय एम एफ, वर्ल्ड बँक आणि जागतिक बँकिंग प्रणालीवर अमेरिकेचा मोठा प्रभाव आहे.

दुसरीकडे अर्थातच चीन आहे. चीन जगाचा कारखाना बनला आहे. स्मार्टफोन, गाड्या, यंत्रसामग्री, औषधे अश्या स्वरूपाची उत्पादने संपूर्ण जगभर चीन पोहोचवते. चीन अनेक देशांना आर्थिकदृष्ट्या स्वतःकडे झुकवत आहे.

युरोपियन युनियन ही स्वतंत्र देशांची संघटना असूनही आर्थिकदृष्ट्या खूप मजबूत आहे – जर्मनी, फ्रान्स, इटलीसारख्या देशांचा औद्योगिक पाया अमेरिकेला टक्कर देतो. असे असले तरीही अर्थव्यवस्थेत अमेरिका अजूनही आघाडीवर आहे, पण चीन तिच्या अगदी जवळ येत आहे. पुढील १५–२० वर्षांत जागतिक अर्थव्यवस्था एकाधिकारातून बहुधुरी (multied-polar) बनू शकते.

**२. लष्करी ताकद – जगाचा पोलीस**

अमेरिकेचा संरक्षण खर्च जगातील पुढील दहा देशांच्या एकत्रित खर्चाइतका आहे. तिचे युद्धनौकांचे ताफे, हवाई दल, ड्रोन, उपग्रह आणि न्यूक्लियर शस्त्रसाठा – सगळे जागतिक दर्जाचे आहेत.

रशियाकडे प्रचंड न्यूक्लियर शक्ती आहे. चीन वेगाने नौदल आणि हवाई दल वाढवत आहे. NATO म्हणजे युरोप-अमेरिकेची संयुक्त लष्करी ताकद – जी कोणत्याही देशासाठी मोठा अडथळा ठरते. यावरून एक गोष्ट पक्की आहे की कोणताही एक देश अमेरिकेला सरळ युद्धात हरवू शकत नाही. पण अमेरिका देखील चीन-रशिया यांच्याविरुद्ध युद्धात सहज विजय मिळवू शकत नाही. त्यामुळे शक्तीचा समतोल तयार होत आहे.

**३. विज्ञान आणि तंत्रज्ञान – सिलिकॉन व्हॅली विरुद्ध आशिया**

अमेरिका म्हणजे Google, Apple, Microsoft, SpaceX, OpenAI, NASA. AI, अंतराळ संशोधन, बायोटेक्नॉलॉजी, सेमीकंडक्टर – सगळ्या आघाड्यांवर अमेरिका आघाडीवर आहे. चीन AI, 5G, ड्रोन, क्वांटम कॉम्प्युटिंगमध्ये प्रचंड गुंतवणूक करत आहे. भारत IT, स्पेस टेक्नॉलॉजी आणि फार्मास्युटिकल्समध्ये झपाट्याने पुढे जात आहे. युरोप हरित तंत्रज्ञान आणि डेटा प्रायव्हसीमध्ये आघाडीवर आहे. विज्ञानात अमेरिका अजूनही लीडर आहे, पण ती एकटी नाही. तंत्रज्ञान आता जागतिक होत आहे.

इतर देशांना अमेरिकेचे ऐकणे भाग आहे का? तर याचे उत्तर 'अजिबात नाही' असेच आहे.

आज अनेक देश अमेरिकेशी सहमत नसतानाही स्वतःचे निर्णय घेतात. रशिया, चीन, इराण, तुर्की, युरोपीय देशही बऱ्याच क्षेत्रात आपले वेगळे निर्णय आपल्या राष्ट्रीय हितानुसार घेतात.

अमेरिकेला विरोध करणे म्हणजे आत्महत्या नाही. जर तुमच्याकडे अर्थव्यवस्था, मुत्सद्देगिरी आणि भागीदार असतील तर आज जग 'अमेरिकेच्या आज्ञेत' नाही, तर 'अमेरिकेच्या प्रभावाखाली' आहे असे म्हणता येइल. अर्थातच हे दोन वेगळे शब्द आहेत. या मध्ये शेवटी असा विचार करणे योग्य आहे की अमेरिका अजूनही जगातील सर्वात शक्तिशाली देश आहे. परंतु आता चीन, युरोप, रशिया, भारत – हे सगळे एक नवीन बहुधुरी जागतिक व्यवस्था तयार करत आहेत. भविष्यात जग एका मालकाचे नसूनअनेक शक्तिकेंद्रांचे असेल. आणि तेच खऱ्या अर्थाने अधिक संतुलित आणि सुरक्षित जग असेल.



**नितीन बक्षी**
**अकोला,**
**९३७०२६०४९१**

सिटी न्यूज अकोला
सोमवार, दि. २ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## संत रविदास महाराज जयंती उत्साहात साजरी

**अकोलाः** दरवर्षी प्रमाणे याही वर्षी १ फेब्रुवारी २०२६ रोजी रेल्वे स्टेशन चौक येथे चर्मकार समाजाच्या वतीने संत रविदास महाराज जयंती मोठ्या आनंद उत्साहात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम मान्यवरांनी संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेला हारअर्पण करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी त्यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकून त्यांनी कशाप्रकारे समतेचा बंधुत्वाचा संदेश प्रबोधन त्यांच्या वाणीतून केले हे आपल्या भाषणातून सांगितले. जयंतीनिमित्त समाजाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी भोजन दानाचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता .

यावेळी चर्मकार समाजाचे नवयुवक संतोष कुरील, खुशाल राजे,दिनेश कुरील, सुरज खेडकर,बबलू देशमुख, कार्तिक जाधव, दीपक जपसरे, सूर्यभान लोढे, रामटेक, पत्रकार शैलेंद्र वानखडे, ज्येष्ठ नेते आबासाहेब शिरसाट व समाजातील बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुर्तीजापुर येथे निशुल्क योग साधना केंद्राचा आरंभ



**मूर्तिजापूरः** शहरात 'जिओ और जीवन दो' या तत्त्वावर चालणाऱ्या भारतीय योग संस्थान पंजीकृत दिल्ली यांचे संलग्न अकोला जिल्ह्याच्यावतीने विदर्भ प्रधान सौ.कैलाशबेन पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली मूर्तिजापूर येथील गोयनका नगरात ,श्री गजानन वाटिका व हनुमान मंदिर येथे ङनिशुल्क योग साधना केंद्राचाङ १ फेब्रुवारी रविवारी शुभारंभ झाला. नागरिकांचा ,विशेषता महिला साधकांचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. योगाच्या नियमित अभ्यासाने शरीर लवचिक व स्वस्थ होऊन योग प्रतिकारक शक्ती वाढते. विद्यार्थ्यांची स्मरणशक्ती व एकाग्रता आणि उंची ही वाढते.अकोला येथील निपुण योग शिक्षक विभागीय सहमंत्री राजेंद्र लाडखेडकर , जिल्हा प्रधान विजय गोखले व सौ. उजाली सोमाणी, जिल्हा मंत्री शामकांत काळे जिल्हा संघटन मंत्री प्रा. प्रवीण ढोणे, सौ सुषमा गोखले, यांनी योगाभ्यास करून घेतला.

## १० वी, १२ वी परीक्षेकरीता सर्व शिक्षक अदलाबदलीचा निर्णय स्थगित

**अकोला :** १० फेब्रुवारी २०२६ पासून राज्यभर बारावीच्या परीक्षा सुरू होत आहे एकूण ३३७३ केंद्रावर या परीक्षा घेतल्या जाणार आहेत तर दहावीच्या परीक्षा दिनांक २० फेब्रुवारी २०२६ पासुन सुरू होणार असून त्या एकूण ५१३० केंद्रावर घेण्यात येणार आहेत.ह्या परीक्षा कॉपीमुक्त व्हाव्यात यासाठी शासनाने अनेक उपाययोजना सुचवल्या होत्या त्या अनुषंगाने राज्य मंडळांनी सुद्धा फेब्रुवारी - मार्च २०२६ मधील दहावी बारावीच्या परीक्षा घेण्याकरिता विविध उपाययोजना सुचविल्या होत्या यामध्ये प्रामुख्याने केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेरे असणे आवश्यक केले होते. शिवाय केंद्र संचालक व पर्यवेक्षणाच्या कामासाठी शिक्षकांची सरसकट अदलाबदल करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. कपिमुक्त अभियाना करिता ज्या विविध सूचना आल्या त्यामध्ये नेहमीच्या सूचने व्यतिरिक्त शिक्षक आंतर बदलाची सूचना पहिल्यांदा आली होती संपूर्ण राज्यभरासाठी हा निर्णय राज्य बोर्डाने घेतला होता शासनाच्या दिनांक ३ डिसेंबर २०२५ च्या पत्रानुसार हा निर्णय झालेला होता मात्र सरसकट शिक्षकांच्या आंतरबदलाला शिक्षक संघटनांचा विरोध होता.

# हिंगोलीत वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे राज्यस्तरीय अधिवेशन थाटात

प्रतिनिधी २ फेब्रुवारी

**अकोलाः** हिंगोली शहरातील महावीर भवनात महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे राज्यस्तरीय दोन दिवसीय अधिवेशन थाटात पार पडले. २७ जानेवारी रोजी शहरातून सकाळी प्रभात फेरी काढण्यात आली होती. त्यानंतर हजारो वृत्तपत्र विक्रेत्यांच्या उपस्थितीत अधिवेशन उत्साहात पार पडले.



अधिवेशनाच्या प्रथम सत्राचे उद्घाटन आमदार तान्हाजी मुटकुळे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला भाजपचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार गजानन घुगे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष बी.डी.बांगर, मराठा सेवा संघाचे खंडेराव सरनाईक, भाजपाचे शहराध्यक्ष पुरोहित, पत्रकार तुकाराम झाडे, डॉ. विजय निलावार, प्रसाद आर्वीकर, कल्याण देशमुख, मनिश खरात, शिवाजी मेटकर, सचिन कावडे, गजानन लोंढे, विलास जोशी, गजानन पवार, गजानन मगर, सुनील पाठक, श्याम सोळंके यांच्यासह हिंगोली वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र हलवाई, उपाध्यक्ष संदीप पाचमासे, सचिव हरीश कीर्तीवार, कोषाध्यक्ष शेख शकील, काशिनाथ कदम, सुभाष अपूर्वा, संजय चांदीवाले, माणिक पंडित, रवी दीक्षित, गजानन तळवणकर, दिलीप अपूर्वा, दिनकर धबडगे, जावेद पठाण, शिवाजी जामुदे, राघो टापरे व अनेक पेपर विक्रेता उपस्थित होते. आमदार तान्हाजी मुटकुळे म्हणाले, वृत्तपत्र विक्रेत्यांचे प्रश्न घेऊन सरकारसमोर मांडू तसेच स्वतंत्र कल्याणकारी मंडळ स्थापन करण्यासाठी प्रयत्न करणार, असे आश्वासन आमदार तानाजी मुटकुळे यांनी दिले. तसेच वृत्तपत्र विक्रेत्यांच्या मागण्या मंजूर करण्यासाठी व राज्यात तळागाळापर्यंत संबंध असलेल्या उपेक्षित वृत्तपत्र विक्रेत्यांना योग्य सहकार्य करून एक इतिहास घडवून आणण्याचे सत्कर्म फडणवीस सरकार करणार अशी आग्रही भूमिका माझी राहील असेही आमदार मुटकुळे म्हणाले. संघटनेचे राज्य अध्यक्ष पाटणकर, बालाजी पवार व अन्य पदाधिकार्यांनी व्यथा मांडल्या आणि आजवर आश्वासन मिळाली पण पूर्तता झाली नसल्याबद्दल खंत व्यक्त करून फडणवीस सरकारने आतातरी मागण्या मंजूर कराव्यात असे त्यांनी आमदार मुटकुळे यांना सांगितले. आमदार मुटकुळे यांनी जिल्हा परिषदेच्या निवडणुकीनंतर मुंबईला या आणि आपण प्रत्यक्ष भेटून मागण्या पदरात पाडून घेण्यासाठी मी आटोकट प्रयत्नशील राहील असे आश्वासन संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना दिले. यावेळी काही विशेष सत्कार करण्यात आले. जेष्ठ वृत्तपत्र विक्रेता एकनाथ पाचमासे यांचा सहपरिवार सत्कार करण्यात आला. तसेच सुभाष अपूर्वा व भास्कर बांगर या वृत्तपत्र विक्रेता ते उद्योजक झाल्याबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला. वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या अधिवेशनाला हिंगोलीतील स्थानिक पत्रकारांसह फोटोग्राफर संघटनेच्या वतीने पाठिंबा देत अधिवेशनात उपस्थिती लावली.

वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या मागण्यांसाठी शासनस्तरावर पाठपुरावा करून मागण्या पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना त्यांच्यासोबत वृत्तपत्र विक्रेता संघटेची बैठक घेण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे माजी खासदार तथा विधान परिषदेचे आमदार हेमंत पाटील यांनी सांगितले.

आमच्या संघटनेत काम करणाऱ्या वृत्तपत्र विक्रेत्यांना सकाळी घरोघरी पेपर टाकून दिवसभर कामासाठी जावे लागते. त्यांना न्याय देण्याचे काम सरकारने करावे, वृत्तपत्र विक्रेत्यांच्या मागणीला न्याय मिळावा व अंमलबजावणी हवी अशी मागणी संघटनेचे कार्याध्यक्ष बालाजी पवार (नांदेड) यांनी आपल्या भाषणातून केली. यावेळी त्यांनी राज्यातील सर्व वृत्तपत्र विक्रेत्यांचे प्रश्न मांडण्याचे काम केले.या अधिवेशनाला अकोला जिल्हा वृत्तपत्र विक्रेता संघाचे जिल्हा अध्यक्ष बी. संतोष कुमार बावस्कर, उपाध्यक्ष विठ्ठलराव वानखडे, कार्यकारी अध्यक्ष हरीश येळने, मंगेश उंबरकर, अमोल मोरे तसेच अकोटचे प्रकाश आमले, गणेश लोणकर, संजय कुलकर्णी, गजानन वडतकर, भरत बंगाले, गोपाल हिंगणकर यांच्यासह राज्यभरातील वृत्तपत्र विक्रेते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जीवनात भगवतीचे अधिष्ठान ठेवा- अंबरीश महाराज

प्रतिनिधी २ फेब्रुवारी




**अकोलाः** यथार्थ जीवनात सदगुरूच्या कृपेची आवश्यकता प्रत्येकाला असते. सदगुरू जवळ बसल्यावर नेहमी भागवत चर्चा केली पाहिजे. सदगुरू शिवाय सदगती मिळणे शक्य नाही. सदगुरूच्या माध्यमातूनच भगवतीचे अधिष्ठान जीवनात निर्माण होऊन शाश्वत सुख व आदीमायेची कृपा प्राप्त होऊन जीवन धन्य होत असल्याचा हितोपदेश भागवताचार्य अंबरीश महाराज जोशी यांनी केला. श्री हरिहर सद्गुरु शक्तीपीठ, संभाजीनगर संचालित श्री जगदंब परिवार अकोलाच्या वतीने केशवनगरातील श्री मारुती मंदिर प्रांगणात सुरू असलेल्या श्रीमद् देवी भागवत सप्ताहात भागवताचार्य अंबरीश महाराज जोशी सोनईकर यांनी देवी भागवतच्या अनुषंगाने सदगुरूचे महत्व प्रतिपादित केले. ते म्हणाले, आपण कितीही ज्ञानी असलो तरी सदगुरु शिवाय खरे ज्ञान हे प्राप्त होऊ शकत नाही.सदगुरू शिवाय मिळालेले ज्ञान हे आंधळे असते.सदगुरू हे जीवनाचा कायापालट करतात. म्हणून सदगुरूला अनन्यभावाने शरण जाऊ सकारात्मक दृष्टी आपल्या अंगी निर्माण करण्याच्या हितोपदेश त्यांनी यावेळी केला. ते म्हणाले, वास्तविक ज्ञानाची प्राप्ती ही सद्गुरूच्या कृपेने प्राप्त होते. देवी भागवताच्या अनुषंगाने आदीमायेची चर्चा केली. सत्र प्रारंभी पूज्य महाराजांची सहधर्मचारीनी भागवत निरूपणकार राजेश्वरी ताई यांचे महिला मंडळाच्या वतीने पूजन करण्यात आले. तर ग्रंथ पूजन शामभाऊ वानखडे यांनी केले. पूज्य अंबरीश महाराज यांचे स्वागत प्रदीप कुलकर्णी, सुनील कुरेकर, विवेक बोंडे, मिलिंद भागवत व जगदंब परिवाराच्या कार्यकर्त्यांनी केले.संचालन शैलेशराव देशमुख यांनी केले.दिनांक २ फेब्रुवारी पर्यंत सायं ५-३० ते रात्री ८ वाजेपर्यंत आयोजित या देवीभागवत कथेचा समस्त भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आवाहन श्रीजगदंब परिवाराचे सेवेकरी शैलेशराव देशमुख, प्रदीप कुलकर्णी,सुनिल कुऱ्हेकर,दिनेश जोशी,निखिल देशमुख,मंदार देशपांडे,गणेश दलाल, विवेक देशपांडे,मयंक देशपांडे, विनायकराव जोशी समवेत समस्त सेवेकऱ्यांनी केले.

## सनातन संस्कृती महासंघातर्फे पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांचा सत्कार

प्रतिनिधी २ फेब्रुवारी



**अकोला :** पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांची सर्वोत्तम पोलीस अधीक्षक म्हणून निवड झाल्याबद्दल सनातन संस्कृती महासंघातर्फे त्यांचा शाल, श्रीफळ आणि पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. आपल्या यशाचे श्रेय अर्चित चांडक यांनी आपले सहकारी आणि कर्मचाऱ्यांना दिले आहे. यावेळी सनातन संस्कृती महासंघाचे नरेंद्र कराळे, मनोज अग्रवाल , अमोल देशपांडे, अमित शिरसाट, हेमल खिलोसिया, सुबोध देशमुख, अमित अग्रवाल, महेश शाह, मोहित नायसे, ऋषिकेश जकाते आणि कार्यकर्ते उपस्थित असल्याचे महासंघाचे प्रसिद्धी प्रमुख विजय केंदरकर आणि देवानंद गहिले यांनी कळविले आहे.

## अकोलखेडला गजानन महाराज प्रगट दिन महोत्सव

प्रतिनिधी २ फेब्रुवारी




**अकोटः** अकोली जहागीर अकोलखेड सजल विहीर शांतीवन अमृत तीर्थ येथे श्री गजानन महाराज प्रगट दिन महोत्सव व ज्ञानयज्ञ, श्री गजानन महाराज विजय ग्रंथाचे पारायण, हरिकीर्तन, श्री शिव महापुराण कथा, कीर्तन सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

सकाळी ५.३० वा. काकडा,७ वाजता श्रींची महाआरती, ८ ते १० विजय ग्रंथाचे पारायण, ११.३० ते १.३० महाप्रसाद, सायंकाळी ५.३० ते ६.३० हरिपाठ हरिनाम कीर्तन प्रारंभ छप्पन भोग तर सांगता ८ फेब्रुवारीला प्रगट दिनी होईल. शिव महापुराण कथा कनकेश्वरी माता सादर करतील. कथेची वेळ दुपारी १ ते सायंकाळी ५ पर्यंत आहे. मुख्य यजमान कैलासचंद्र गणेशलालजी अग्रवाल, कुमुदिनी कैलासचंद्र अग्रवाल, उमेशशंकर लोहिया, पूजा उमेश लोहिया. दैनंदिन भाविक भक्तांसाठी दररोज अन्नदान सुरु आहे. कीर्तनाची वेळ रात्री ८ ते १० राहणार आहे. सोमवारी हभप शिवाजी महाराज झांमरे शिवचरित्रकार बरफगाव, मंगळवारी हभप विशाल महाराज बढे बोरी चंद्रशेखर, बुधवारी हभप नम्रताताई काळे यवतमाळ, गुरुवारी हभप लक्ष्मण महाराज देवकर आळंदी देवाची, शुक्रवारी हभप गजेंद्र चैतन्यजी महाराज मधापुरी, शनिवारी हभप अमोल महाराज घुगे आळंदीकर, रविवारी हभप अभिषेक महाराज ठाकूर यांचे काल्याचे किर्तन सकाळी ८ ते ११ पर्यंत राहील. महाप्रसाद दुपारी १२ ते ४ पर्यंत राहील, शुक्रवारी सकाळी १० ते ४ दरम्यान रक्तदान शिबिर ठेवले आहे.

## अस्मिता इंग्लिश प्रायमरी स्कूल व रुक्मिणी शिशु मंदिरात वार्षिक स्नेह संमेलन

प्रतिनिधी २ फेब्रुवारी



**अकोला :**जुने शहरातील कल्याणी महिला मंडळ द्वारा संचालित अस्मिता इंग्लिश प्रायमरी स्कूल व रुक्मिणी शिशु मंदिर येथील वार्षिक स्नेहसंमेलन 'आपली संस्कृती आपला अभिमान' संकल्पनेवर उत्साहात पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वृंदाताई देशपांडे तर प्रमुख पाहुण्या आदरणी सौ. कांचनताई पटोकार ह्या उपस्थित होत्या. प्रमुख पाहुण्यांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. शाळेतील शिक्षिकांनी स्वागतगीत सादर केले प्रमुख अतिथींनी विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी मार्गदर्शन केले.शाळेतील नर्सरी ते वर्ग चौथी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. भारतीय संस्कृती, परंपरा व सण यांचे दर्शन घडवणारे नृत्य, गीत विद्यार्थ्यांनी सादर केले. लहानग्यांच्या सादरीकरणाने उपस्थितांची विशेष दाद मिळवली. महाराष्ट्रातील प्रत्येक सणाचा देखावा सादर करण्यात आला. कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, संस्कृतीचे महत्त्व व राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्यात आला.

मुख्याध्यापिका सौ. कल्पना भुकन यांनी प्रास्ताविक सादर केले आणि विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती जपण्याचा संदेश दिला. कल्याणी महिला मंडळाच्या संचालिका ताराताई हातवळणे, प्रतिभाताई गावपांडे, मीनाताई अलकरी, मंदाताई खानझोडे, मंजिरीताई जपे ह्या उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी शाळेतील शिक्षकांचे सहकार्य लाभले. यामध्ये सौ.कविता देशमुख ,सौ.शुभांगी अंबुलकर ,सौ. राधिका मलकापूरकर ,सौ.अर्चना इंगळे सौ. वर्षा दहिकर तसेच शिक्षकेतर कर्मचारी सौ वनिता पराते सौ लक्ष्मी सीडाम यांचा विशेष सहभाग होता.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. हेमा वर्मा आणि सौ. सोनाली ताकवाले यांनी केले तर आभारप्रदर्शन सौ.सोनल गंगाखेडकर यांनी मानले.

## मक्तब जावेदिया बैदपुरा मध्ये वार्षिक जलसा साजरा



प्रतिनिधी २ फेब्रुवारी

**अकोलाः** इस्लामी तालीमी इदारा मक्तब जावेदिया बैदपुरा यांच्या वतीने लाल बंगला स्थित मदरसेमध्ये या वर्षीही मोठ्या उत्साह आणि धार्मिक वातावरणात वार्षिक जलसा व कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमात मदरशेतील मुलांनी दिनी तालीमशी संबंधित नात, भाषण आणि कलाम सादर केले, ज्याचे उपस्थित पालक आणि पाहुण्यांनी भरभरून कौतुक केले. मुलांची हौसला अफजाई करण्यात आली आणि उलेमा-ए-कराम यांनी मुलांना फक्त धार्मिकच नव्हे, तर जागतिक शिक्षण घेण्याची आणि चांगले अखलाक अंगिकारण्याचीही सल्ला दिला.

या कार्यक्रमास वरिष्ठ काँग्रेस नेते महबूब खान उर्फ मब्बा पहलवान, जावेद खान, मिया खान, नगरसेवक रफीक सिद्दीकी, फ़ैयाज खान, सैयद वसीम, सामाजिक कार्यकर्ता जावेद ज़करिया, अज़ाज़ पहलवान, जावेद खान शाबाज खान सहित मोठ्या संख्येने बिरादरीचे लोक आणि उलमा-ए-कराम उपस्थित होते. कार्यक्रमाचे मुख्य वक्ते अकोला येथील वरिष्ठ आलिम-ए-दीन हजरत मौलाना कारी अब्दुल करीम साहेब होते. कार्यक्रमाच्या शेवटी मुलांच्या उज्ज्वल भविष्याकरिता प्रार्थना करण्यात आली.

## संत रविदास महाराज सामाजिक समरसतेचे प्रतीक : आमदार रणधीर सावरकर

प्रतिनिधी २ फेब्रुवारी



**अकोलाः** सामाजिक समरसता, मानवता भक्ती श्रद्धा विश्वास आणि हिंदू संस्कृतीचा परंपरा वृद्धींगत करण्याचे काम संत रविदास महाराज यांनी केले. त्यांचे विचार आजही प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन भाजपा प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर यांनी केले.

भारतीय जनता पक्षाच्या वतीने संत रविदास महाराजांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करताना ते बोलत होते. कर्माला प्राधान्य देण्याचे भगवान श्रीकृष्णांनी गीतेमध्ये सांगितले. ते संत रविदासांनी कृतीमध्ये सिद्ध करून काम कोणतेही लहान मोठे नसते तर ते प्रत्येक ईश्वराने दिलेली जबाबदारी ही पूर्ण करणे आणि ज्या परिस्थितीमध्ये राहतो त्या परिस्थितीमध्ये आनंदाने कशा पद्धतीने जीवन जगावे याचे उत्तम उदाहरण संत रविदास महाराज आहेत असे आमदार रणधीर सावरकर म्हणाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जयंत मसने होते. तर विजय अग्रवाल, संतोष शिवरकर, धनंजय धबाले, शिवलाल इंगळे, पुरुषोत्तम पांचाळे, रवी गावंडे, पुरुषोत्तम पानझाडे, माधव मानकर, विवेक भरणे, शंकरराव वाकोडे, राजेश बेले, मनीराम टाले, गवई गुरुजी, अंबादास उमाळे, वैशालीताई शेळके, गीतांजली शेगोकार ,चंदाताई शर्मा, चंदाताई ठाकूर, संतोष पांडे अजय शर्मा, किशोर कुचके, गणेश लोड, जय शर्मा संजय कोरडे, संजय जोशी, रमाकांत भरकर , गणेश अंधारे गोपाल मुळे, अनिल गरड, शरद तुरकर, सुभाष खंडारे, हरीश काळे, रुपेश यादव, उज्वल बामनेट, गोपाल नागापुरे, हिरालाल कृपलानी उपस्थित होते.

## पीक विमा रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करा

◆ क्रांतिकारी शेतकरी संघटनेची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

प्रतिनिधी २ फेब्रुवारी




**मूर्तिजापूरः** क्रांतिकारी शेतकरी संघटना वर्ष २०२५ मध्ये ऑगस्ट सप्टेंबर मध्ये ढगफुटी सदृश तालुक्यात पाऊस झाला त्यामुळे सर्व तालुक्यातील सोयाबीन तूर पिकाचे अतोनात नुकसान झाल्यामुळे शेतकऱ्याची बरेच आर्थिक नुकसान झाले त्याचा सर्वे करून शासनाने शेतकऱ्यांना तोडकी मदत दिली परंतु शासनाने प्रधानमंत्री पिक विमा योजनेत नैसर्गिक आपत्ती नुकसान भरपाई ते निकष रद्द केल्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पीक विम्याचा फायदा झाला नाही परंतु शासनाने ओल्या दुष्काळ परिस्थिती आहे असे जाहीर करून दुष्काळाचे निकष लावू तोडकी मदत दिली नंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस यांनी सर्वांना पिक विमा मिळणार असल्याचे जाहीर केले परंतु त्यावर सहा महिने उलटून सुद्धा पिक विमा संदर्भात कुठली हालचाल दिसत नाही. अस्मानी व सुलतानी संकटानि घेरल्या गेलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यावर तात्काळ पिक विमा जमा करावा अन्यथा क्रांतिकारी शेतकरी संघटना मुर्तीजापुर च्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असे निवेदन जिल्हा संघटक राहुल वानखडे यांच्या नेतृत्वात उपविभागीय अधिकारी मुर्तीजापुर यांच्या मार्फत मुख्यमंत्री साहेबांना निवेदन द्वारे देण्यात आले.यावेळी जिल्हा उपाध्यक्ष रियाज ,प्रवीण पाटील खोत, संतोष रुद्रकार,रामदास भगत श्याभाऊ पाचळे सचिन देशमुख युवराज घाडगे सह क्रांतीकारी संघटनेचे पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

## पोपटखेड येथील वीर एकलव्य शोध व बचाव पथकाचा गौरव



प्रतिनिधी २ फेब्रुवारी

**अकोटः** शहर पोलीस स्टेशन मध्ये स्नेहसंमेलन कार्यक्रमात वीर एकलव्य शोध व बचाव पथकाचा भव्य सत्कार करण्यात आला. अकोट उपविभागीय पोलीस अधिकारी निखिल पाटील यांच्या हस्ते पथकातील सदस्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले. वन विभागात कोणतीही हिंसक प्राण्यांची घटना घडली. त्यामध्ये तथा कुठेही अपघात झाल्यास तातडीने पोचून तातडीने व्यवस्था लावणे, आपत्ती व्यवस्थापन, पूर परिस्थिती, कुठल्याही सांप्रदायिक कार्यक्रमात यात्रा महोत्सवात सर्व सदस्यांच्या मदत कार्याबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी पांडुरंग तायडे, अर्जुन मोहन मोरे, आकाश राधेश्याम कटोते,भारत शिवदास बावनकर, अर्जुन सदाशिव गडरिया, सतीश लक्ष्मण ठाकूर, योगेश लक्ष्मण ठाकरे, पवन श्रावण तायडे, योगेश सुरेश ठाकूर, रोहित रूपराव सुरत्ने, दीपक मनोहर ठाकरे, शिव बेलसरे, उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
सोमवार, दि. ०२ जानेवारी २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# सत्ताधारी म्हणतात विकसित पाऊल, विरोधक म्हणतात ‘अर्थ’हिन संकल्प

प्रतिनिधी २ जानेवारी

**यवतमाळ** : रविवारी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी संसदेत २०२६–२७ चा केंद्रीय अर्थसंकल्प सादर केला.


सत्ताधारी पक्षाचे नेते अर्थसंकल्पाला विकसित भारताकडे टाकलेले ठोस पाऊल असल्याचा दावा केला आहे. सरकारच्या म्हणण्यानुसार हा अर्थसंकल्प पायाभूत सुविधा, गुंतवणूक, रोजगारनिर्मिती, महिला व विद्यार्थी सक्षमीकरण यावर लक्ष केंद्रित करणारा आहे.

‘लखपती दीदी’ योजना, मुलींसाठी वसतीगृह, आरोग्य व बायो-फार्मा क्षेत्रातील उपक्रम यासारख्या महत्त्वाच्या प्रकल्पांना प्राधान्य देण्यात आले आहे. तर विरोधक अर्थसंकल्पाबाबत कठोर टीका करीत आहेत.

त्यांचा दावा आहे की कृषीप्रधान देशात शेतकऱ्यांसाठी यामध्ये अर्थपूर्ण धोरणांचा अभाव असून हा ‘अर्थ’हिन संकल्प ठरला आहे. कृषी क्षेत्रातील अपेक्षित गुंतवणूक आणि सुधारणा न दिल्यामुळे शेतकऱ्यांचे हित साधले जाणार नाही, असा विरोधकांचा आरोप आहे.

सरकार व विरोधक यामध्ये अर्थसंकल्पाच्या परिणामकारकतेवर चर्चा सुरू असून, आगामी काळात प्रत्यक्ष अंमलबजावणीमुळे संकल्प कितपत प्रभावी ठरेल, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## विकसित भारताच्या दिशेने ठोस पाऊल : ना.संजय राठोड




■ **यवतमाळ** : केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी संसदेत सादर केलेला २०२६-२७ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प सर्वसमावेशक विकास, पायाभूत सुविधांचा विस्तार आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देणारा असल्याची प्रतिक्रिया महाराष्ट्राचे मंत्री संजय राठोड यांनी व्यक्त केली. हा अर्थसंकल्प ‘विकसित भारत २०४७’ या राष्ट्रीय ध्येयाच्या दिशेने नेणारा स्पष्ट आणि दूरदृष्टीचा रोडमॅप असल्याचे त्यांनी नमूद केले. विक्रमी भांडवली खर्च, रेल्वे, लॉजिस्टिक्स, जलमार्ग, उद्योग आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील गुंतवणुकीमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला नवी चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कररचनेत स्थिरता राखून मध्यमवर्गाला दिलासा देण्यात आला असून, पायाभूत सुविधांवरील मोठ्या गुंतवणुकीमुळे देशांतर्गत मागणी आणि आर्थिक विकास अधिक बळकट होईल, असा विश्वास राठोड यांनी व्यक्त केला. “हा अर्थसंकल्प केवळ आर्थिक आकडेमोड नसून गरीब, शेतकरी, कामगार आणि तरुणाईच्या आशा-आकांक्षांना बळ देणारा विकासाचा आराखडा आहे. माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे अभिनंदन करतो,” असेही त्यांनी नमूद केले.

## कृषी क्षेत्रासाठी 'अर्थ'हीन संकल्प : मनीष जाधव



■ **यवतमाळ** : आज सादर झालेला केंद्रीय अर्थसंकल्प हा पूर्णतः अर्थहीन असून कृषीप्रधान देशातील शेतकऱ्यांच्या अपेक्षांवर पाणी फेरणारा ठरला आहे, अशी तीव्र प्रतिक्रिया स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रदेश प्रवक्ता व शेतकरी नेते मनीष जाधव यांनी व्यक्त केली. शेतकऱ्यांना अग्रस्थानी ठेवून कृषी क्षेत्रासाठी कोणतीही ठोस योजना अथवा भरीव आर्थिक तरतूद करण्यात आलेली नसल्याने या अर्थसंकल्पातून शेतकऱ्यांच्या पदरी पुन्हा एकदा निराशाच पडली असल्याचे त्यांनी नमूद केले. अत्यल्प आर्थिक गुंतवणूक, शेतीला उद्योगाचा दर्जा देण्याबाबत कोणताही स्पष्ट निर्णय नसणे, तसेच कृषी क्षेत्राला करप्रणालीतून सवलत न मिळणे, हे या अर्थसंकल्पाचे मोठे अपयश असल्याचे ते म्हणाले. प्रधानमंत्री पीक विमा योजनेसाठी विशेष तरतूद, तसेच नैसर्गिक आपत्ती, अतिवृष्टी आणि ओल्या दुष्काळामुळे आर्थिकदृष्ट्या उध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देऊन दिलासा मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र, त्या सर्व अपेक्षा धुळीस मिळाल्याने घोर निराशा झाली असल्याची भावना जाधव यांनी व्यक्त केली. “शेतीच्या नावावर अर्थसंकल्पात ज्या काही तुरळक घोषणा करण्यात आल्या आहेत, त्या केवळ तोंडाला पाने पुसण्यापुरत्याच असून हा अर्थसंकल्प म्हणजे ‘बाल्टीभर फेस’ आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर ठोस उपाय न करता हा अर्थसंकल्प शेतकऱ्यांसाठी केवळ एक फार्स ठरला आहे,” असा घणाघात मनीष जाधव यांनी केला.

## अर्थव्यवस्थेला गती मिळेल



■ आज सादर झालेल्या केंद्रीय अर्थ संकल्पातून ‘विकसित भारत’ या संकल्पनेला ठोस दिशा देण्याचा प्रयत्न दिसून येतो. अर्थव्यवस्थेला गती देत भारताला तिसऱ्या क्रमांकाच्या जागतिक अर्थशक्तीच्या दिशेने नेण्याचा निर्धार या बजेटमध्ये स्पष्ट आहे. जागतिक दर्जाच्या सुविधा निर्माण करण्यावर भर देत संरक्षण व अंतर्गत सुरक्षा, कृषी व उद्योग, पर्यटन विकास, आरोग्य व पर्यावरण संवर्धन, पायाभूत सुविधा तसेच सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना चालना देणाऱ्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. रोजगारनिर्मितीला प्रोत्साहन देणाऱ्या योजनांमुळे तरुणांसाठी नव्या संधी उपलब्ध होतील, असा विश्वास व्यक्त होत आहे. एकूणच हा अर्थसंकल्प सर्वसमावेशक विकासाचा आशावाद निर्माण करणारा आहे.

- अजय मुंधडा

## समतोल साधणारा अर्थसंकल्प



■ “आज सादर झालेला केंद्रीय अर्थसंकल्प हा विकास, स्थैर्य आणि समावेशकतेचा समतोल साधणारा आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था, MSME क्षेत्र, सहकारी संस्था, कृषी व पायाभूत सुविधा यांना चालना देणाऱ्या तरतुदींवर विशेष भर देण्यात आला आहे. डिजिटल व्यवहार, आर्थिक शिस्त, रोजगारनिर्मिती आणि वित्तीय समावेशन यामुळे सहकारी बँका व पतसंस्थांसाठीही सकारात्मक वातावरण निर्माण होईल. एकूणच हा अर्थसंकल्प देशाच्या दीर्घकालीन आर्थिक मजबुतीसाठी पूरक ठरेल.”अशी प्रतिक्रीया धनंजय तांबेकर, व्यवस्थापकीय संचालक, गोदावरी अर्बन तथा संचालक राज्य सहकारी फेडरेशन यांनी दिली.

## निराशाजनक अर्थसंकल्प



■ केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेला अर्थसंकल्प ग्रामीण भारत, शेतकरी, कष्टकरी व कामगार वर्गासाठी निराशाजनक असल्याची तीव्र टीका शेतकरी चळवळीचे कार्यकर्ते प्रा. पंढरी पाठे यांनी केली. देशातील ६५ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहत असताना शेतीमालाला हमीभाव, कर्जमाफी, सिंचन, पशुसंवर्धन व कोरडवाहू भागासाठी विशेष तरतुदी नसल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. महागाई, वाढता उत्पादनखर्च व कामगारांसाठी सामाजिक सुरक्षेचा अभाव ही गंभीर बाब असल्याचे सांगत, हा अर्थसंकल्प शेतकरी व कामगारविरोधी असल्याचा आरोप त्यांनी केला.

# केंद्रिय अर्थसंकल्प : गोरगरिब, युवक आणि विकसित भारतासाठी दमदार पाऊल



■ **उमरखेड** : संसदेत केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी २०२६–२७ चा अर्थसंकल्प सादर केला. जागतिक अस्थिर परिस्थितीचा विचार करता, हा अर्थसंकल्प देशाच्या सर्वसमावेशक आणि शाश्वत विकासाला गती देणारा ठरतो. अर्थसंकल्पाचे तीन मुख्य उद्दिष्टे आहेत – आर्थिक लवचिकता राखून विकासाचा वेग टिकवणे, सामान्य नागरिकांच्या क्षमता वाढवून त्यांना भारताच्या समृद्धीचा भागीदार बनवणे,आणि प्रत्येक कुटुंब,समुदाय व प्रदेशाला विकास प्रक्रियेत संधी उपलब्ध करून देणे. शेती, उद्योग, पर्यटन, रोजगारनिर्मिती, महिला व विद्यार्थी विकास, आरोग्य आणि पायाभूत सुविधा या क्षेत्रावर विशेष भर दिला आहे. आधुनिक पायाभूत सुविधांसाठी १२ लाख कोटी रुपयांची तरतूद हा ऐतिहासिक निर्णय आहे. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी ‘लखपती दीदी’ योजनेनंतर स्वतंत्र मॉल्स आणि उद्योग संधी निर्माण करण्याचे उपाय केले आहेत. उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी जिल्हास्तर वसतीगृहांची योजना राबवली जाईल. आरोग्य क्षेत्रात जिल्हा रुग्णालयांमध्ये आपातकालीन सेवा, आयुर्वेदिक उपचार व बायो-फार्मा धोरणावर भर दिला आहे. मुंबई-पुणे, पुणे-हैदराबाद हायस्पीड कॉरिडॉरसह शहरांचा नियोजनबद्ध विकास व गुंतवणूक रोजगार निर्माण करणार आहे. हा अर्थसंकल्प युवक, महिला, शेतकरी आणि सामान्य नागरिकांना केंद्रस्थानी ठेवून विकसित भारताकडे आत्मविश्वासाने टाकलेले पाऊल आहे.

**— आमदार किसनराव वानखेडे, उमरखेड – महागाव विधानसभा**

# केंद्राचा अर्थसंकल्प म्हणजे जनतेची फसवणूक



**यवतमाळ** : केंद्र सरकारने सादर केलेला अर्थसंकल्प हा शेतकरी, कष्टकरी, युवक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या अपेक्षांवर पाणी फेरणारा असून, तो जनतेच्या विश्वासाची उघड फसवणूक असल्याची टीका काँग्रेस पक्षाने केली आहे. ‘सबका साथ, सबका विकास’ हा केवळ घोषणांचा बुरखा असून प्रत्यक्षात हा अर्थसंकल्प मोजक्यांच्या हिताचा असल्याचा आरोप काँग्रेसचे पदाधिकारी अनिल गायकवाड यांनी केला आहे.

देशातील शेतकरी संकटात असताना, उत्पादनखर्च वाढलेला असताना आणि नैसर्गिक आपत्तीमुळे शेती उद्ध्वस्त होत असताना, शेतकऱ्यांना दिलासा देणारी कोणतीही ठोस तरतूद अर्थसंकल्पात नसल्याचे काँग्रेसचे म्हणणे आहे. किमान आधारभूत किंमत कायदेशीर करण्याची मागणी पुन्हा डावलण्यात आली असून, कर्जमाफी, पीकविमा सुधारणा व सिंचन प्रकल्पांकडेही दुर्लक्ष करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला.

महागाईने सर्वसामान्य नागरिक हैराण झाला असताना, गॅस, इंधन, औषधे व जीवनावश्यक वस्तूंच्या दरवाढीवर नियंत्रण आणण्यासाठी कोणतीही ठोस पावले उचलण्यात आलेली नाहीत. मध्यमवर्गीय आणि गरीब जनतेला दिलासा देण्याऐवजी त्यांच्यावर करांचा अतिरिक्त बोजा टाकण्यात आल्याची टीका करण्यात आली.

युवकांसाठी रोजगारनिर्मितीच्या ठोस योजना नसल्याने हा अर्थसंकल्प निराशाजनक असल्याचे काँग्रेसने म्हटले आहे. बेरोजगारी वाढत असताना आणि सरकारी भरती रखडलेल्या असताना, शिक्षण व रोजगाराबाबत ठोस दिशा नसल्याचा आरोप करण्यात आला.

हा अर्थसंकल्प पूर्णतः जनविरोधी असून काँग्रेस पक्ष त्याचा निषेध करीत असल्याचे यवतमाळ जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष अनिल गायकवाड यांनी सांगितले. जनतेच्या हक्कांसाठी रस्त्यापासून संसदपर्यंत संघर्ष सुरू ठेवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

## केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ : बहुजन,कष्टकरी व वंचित घटकांच्या अपेक्षांचा विश्वासघात



■ आज सादर झालेल्या केंद्रीय अर्थसंकल्पावर वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष,गटनेते तथा नगरसेवक डॉ.नीरज वाघमारे यांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.हा अर्थसंकल्प बहुजन समाज,कष्टकरी,शेतकरी,कामगार,महिला व युवकांच्या मूलभूत प्रश्नांना स्पर्शही न करणारा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महागाई नियंत्रण,रोजगारनिर्मिती,सामाजिक सुरक्षेच्या योजनांबाबत सरकार पूर्णपणे अपयशी ठरल्याचा आरोप त्यांनी केला. अनुसूचित जाती-जमाती, ओबीसी, अल्पसंख्याक व वंचित घटकांसाठी स्वतंत्र व भरीव तरतुदी नसणे ही गंभीर बाब असल्याचे डॉ.नीरज वाघमारे यांनी सांगितले. शिक्षण, आरोग्य, पोषण आहार व सामाजिक न्यायाच्या योजना कमकुवत केल्याने गरिबांवरील अन्याय अधिकच वाढणार आहे.विदर्भासारख्या मागास भागातील शेती,पाणी व रोजगाराच्या प्रश्नांकडे केंद्र सरकारने पुन्हा एकदा दुर्लक्ष केल्याची टीका त्यांनी केली. हा अर्थसंकल्प कॉर्पोरेटधार्जिणा असून सामान्य जनतेसाठी नसल्याचे स्पष्ट झाले आहे,असे सांगत डॉ.नीरज वाघमारे यांनी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने या अर्थसंकल्पाचा निषेध केला. बहुजन व वंचित समाजाच्या हक्कांसाठी रस्त्यावर आणि लोकशाही मार्गाने संघर्ष अधिक तीव्र केला जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

# कष्टकरी व शेतकऱ्याच्या जखमेवर मीठ चोळणारा प्रकार



■ आज सादर झालेला केंद्रीय अर्थसंकल्प पाहता सरकारची जनतेप्रती असलेली संवेदनशून्यता पुन्हा एकदा उघड झाली आहे. हा अर्थसंकल्प सर्वसामान्य शेतकरी, कष्टकरी आणि ग्रामीण भागाच्या प्रश्नांपासून कोसो दूर असून, मूठभर भांडवलदार व कॉर्पोरेट वर्गाला खूश करण्यासाठी रचलेला एक दिखाऊ ‘इव्हेंट’ ठरतो, अशी तीव्र टीका आमदार संजय देरकर यांनी केली. देशाचा कणा असलेल्या बळीराजासाठी हमीभाव, कर्जमाफी यांसारख्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर सरकारने सोयीस्कर मौन पाळले आहे. बियाणे, खते, डिझेलच्या वाढत्या किमतींमुळे शेतकरी आधीच संकटात असताना, या अर्थसंकल्पात त्याला दिलासा देणारी कोणतीही ठोस तरतूद नाही, ही गंभीर बाब असल्याचे देरकर म्हणाले. आदिवासी बांधव, कोरडवाहू भागातील कष्टकरी तसेच उपेक्षित घटकांसाठी विशेष योजना न दिसणे हे सरकारच्या प्राधान्यक्रमावर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे. ग्रामीण आरोग्य, शिक्षण आणि मूलभूत सुविधांकडे झालेले दुर्लक्ष दीर्घकालीन दुष्परिणाम करणारे ठरेल, असा इशाराही त्यांनी दिला. असंघटित क्षेत्रातील कामगार, शेतमजूर व महिला कामगार यांच्या सामाजिक सुरक्षेबाबत, वेतनवाढीबाबत कोणतीही ठोस पावले उचलण्यात आलेली नाहीत. ज्यांच्या श्रमावर देशाची अर्थव्यवस्था उभी आहे, त्यांनाच विसरण्याचा हा अमानवीय प्रकार असल्याची टीका त्यांनी केली. घरगुती गॅसपासून दैनंदिन गरजेच्या वस्तूंपर्यंत वाढलेल्या महागाईवर नियंत्रण मिळवण्यात सरकार पूर्णपणे अपयशी ठरल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. एकूणच, हा अर्थसंकल्प विकासाचा नव्हे तर सामान्य जनतेच्या अपेक्षांवर पाणी फेरणारा असल्याचा सूर विरोधकांकडून उमटत आहे.

## हॉकर्ससाठी कुठलीही तरतूद नाही



■ आज झालेल्या आर्थिक बजेट मध्ये सर्वसाधारण हॉकर्स आणि छोटे व्यापारी यांच्या साठी कुठलीही तरतूद करण्यात आलेली नाही, त्यानां कुठले ही विमा संरक्षण नाही तसेच त्यांना आर्थिक सबळी करण्यासाठी कुठलीच तरतूद नाही हा अर्थ संकल्प केवळ देशातील लोकांना पुन्हा मूर्ख बनवण्याचा करेक्रम आहे.

**- सुरज खोब्रागडे, यवतमाळ हॉकर्स असोसीएशन, अध्यक्ष**

# अवैध देशी दारू वाहतूक उघडकीस; ऑटो रिक्षासह 1.65 लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी २ जानेवारी

**पांढरकवडा** : पांढरकवडा पोलीस स्टेशनच्या गुन्हे शोध पथकाने 1 फेब्रुवारी 2026 रोजी गोपनीय माहितीच्या आधारे सापळा रचून अवैध देशी दारूची वाहतूक करणारी ऑटो रिक्षा पकडली. या कारवाईत 1 लाख 65 हजार 360 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एका आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्हे शोध पथक परिसरात गस्त घालत असताना गोपनीय बातमीदाराकडून माहिती मिळाली की, पाटणबोरी येथील ऑटो पॉईंटवरून पिवळ्या रंगाची ऑटो रिक्षा (क्रमांक AP-01TA-0072) अवैध दारू घेऊन पिंपरी गावाकडे जात आहे. माहिती मिळताच पोलिसांनी सदर ऑटो अडवून पंचासमक्ष झडती घेतली. झडतीदरम्यान ऑटोच्या मागील बाजूस खाकी रंगाचे चार पुठ्ठा बॉक्स आढळले. त्यामध्ये ‘संजीवनी’ देशी दारूचे बॉबी संत्रा कंपनीचे 180 मिलीचे एकूण 192 सिलबंद पव्वे आढळून आले. प्रत्येकी 80 रुपये दराने या दारूची किंमत 15 हजार 360 रुपये असून, वापरात असलेली पिवळ्या रंगाची ॲपे शिटर ऑटो रिक्षा (किंमत 1 लाख 50 हजार रुपये) असा एकूण 1 लाख 65 हजार 360 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी रिक्षा चालक व मालक विठ्ठल लच्छमन्ना बासावार (वय 47, रा. वठोली, ता. झरी, जि. यवतमाळ) याला ताब्यात घेण्यात आले असून त्याच्यावर महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम 65 (अ) (ई) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात तसेच सहाय्यक पोलीस अधीक्षक व उपविभागीय पोलीस अधिकारी रॉबिन बन्सल यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलीस निरीक्षक एल. डी. तावरे यांच्या सूचनेनुसार गुन्हे शोध पथकातील पोलीस उपनिरीक्षक नितीन सुशिर, पोलीस हवालदार विलास जाधव तसेच पोलीस नाईक सचिन काकडे, संदीप मडावी आणि पोलीस कॉन्स्टेबल राजू मुत्यालवार यांनी ही यशस्वी कारवाई केली.

# डिझेल टँकरच्या धडकेत युवक जागीच ठार

प्रतिनिधी २ जानेवारी

**यवतमाळ** : अकोलावरून रेल्वे कॅम्पसाठी डिझेल घेऊन जाणाऱ्या टँकरने दुचाकीला धडक दिली. या अपघातात दुचाकीस्वार जागीच ठार झाला. ही घटना खंडाळा ते मुळावा मार्गावरील ईनापूर फाट्यानजीक शनिवारी रात्री ८ वाजताच्या सुमारास घडली. अपघात इतका भीषण होता की, दुचाकीस्वाराचा अर्धा चेहरा कापून टँकरच्या टायरच्या वरील भागात अडकून टँकरसोबत आला. राहुल प्रल्हाद ढगे रा. मांडवा, असे अपघातात ठार झालेल्या युवकाचे नाव आहे. तो एमएच २९, बीएन ४६५७ क्रमांकाच्या दुचाकीने लोणंदरी येथील यात्रा आटोपून गावी येत होता. अशातच अकोल्यावरून डिझेल घेऊन येणाऱ्या एमएच ३० बीडी ०३७५ क्रमांकाच्या टँकरने दुचाकीला धडक दिली. यात दुचाकीस्वार जागीच ठार झाला. या घटनेनंतर टँकरचालकाने तिथून पळ काढत टैंकर थेट उमरखेड तालुक्यातील गंगनमाळ फाटा असलेल्या रेल्वे कॅम्पमध्ये आणून उभा केला. काही कळायच्या आत चालकाने पळ काढला. टँकरचालक पळाल्याने कॅम्पमधल्या नागरिकांनी टँकरची पाहणी केली असता टँकरच्या उजव्या बाजूच्या मागच्या टायरच्यावर काही रक्ताचे डाग आणि माणसाचे अर्धेशीर कापलेल्या अवस्थेत अडकलेले दिसले. ही माहिती पोफाळी पोलिसांना मिळताच पोफाळीचे ठाणेदार

# कृषी गौरव पुरस्कारातून अनुभव, ज्ञान व तंत्रज्ञानाची व्याप्ती वाढविण्याचा संकल्प : डॉ.विजयराव माने

## भाऊसाहेब माने राज्यस्तरीय कृषी गौरव पुरस्काराने 26 कर्तृत्ववानांचा सन्मान

प्रतिनिधी २ जानेवारी

**उमरखेड** : शेतकरी हा आपल्या अनुभवाच्या आधारे शेतीत सातत्याने नवे प्रयोग करणारा संशोधकच असतो. स्वतःच्या अनुभवातून आत्मसात केलेल्या तंत्रज्ञानावर शेतकऱ्यांचा ठाम विश्वास असतो. शेतकरी आणि शेती समृद्ध व्हावी, या उद्देशाने आयोजित कृषी गौरव पुरस्कार व कार्यशाळेच्या माध्यमातून कृषी क्षेत्रात अवगत झालेले ज्ञान, अनुभव आणि तंत्रज्ञानाची व्याप्ती वाढवून ते तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचा उद्देश असल्याचे मत कृषी महाविद्यालयाचे चेअरमन डॉ. विजयराव माने यांनी व्यक्त केले.

लोकनेते, सहकारमहर्षी स्व. भाऊसाहेब माने यांच्या स्मृतिदिनानिमित्त गेल्या 24 वर्षांपासून दरवर्षी जानेवारी महिन्यात राज्यस्तरीय कृषी कार्यशाळा व कृषी गौरव पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. या उपक्रमाच्या माध्यमातून शेतीतील नवनवीन तंत्रज्ञान, संशोधन, प्रक्रिया उद्योग, शेतीपूरक व्यवसाय व यशस्वी प्रयोगांची माहिती ‘ट्रान्स्फर ऑफ टेक्नॉलॉजी’च्या माध्यमातून थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य केले जात आहे.



या कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. शरद गडाख (कुलगुरू, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला) यांच्या हस्ते झाले. यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात 26 कर्तृत्ववान शेतकरी, कृषी शास्त्रज्ञ, कृषी उद्योजक, शेतीविषयक लेखन करणारे पत्रकार व कृषी विस्तारकांना ‘भाऊसाहेब माने राज्यस्तरीय कृषी गौरव पुरस्कार’ प्रदान करून सन्मानित करण्यात आले. सत्कारमूर्तींनी आपल्या यशामागील अनुभव, संघर्ष व प्रयोगांची माहिती मांडली. पारंपरिक ज्ञान, आधुनिक कृषी विद्यापीठीय तंत्रज्ञान आणि प्रत्यक्ष शेतातील अनुभव यांचा मिलाफ साधत ज्ञानाची प्रभावी देवाणघेवाण घडून आली.

यावेळी डॉ. महेंद्र ढवळे, पांडुरंग आवाड, कृष्णकुमार राठी, सुरेंद्र नारखेडे, दिशा उदगीरकर, श्रीपत राठोड, अंकिता मोरे, मिलिंद देशमुख, मनोज माळी, रविंद्र मेटकर यांनी मनोगत व्यक्त केले. प्रमुख पाहुणे म्हणून खासदार नागेश आष्टीकर, आमदार किसनराव वानखेडे, डॉ. भारत बास्टेवाड, गणेश शिंदे, शिवराम घोडके, अनिरुद्ध पाटील चोंढीकर, नितीन भुतडा, डॉ. विजयराव माने, मनोजकुमार ढगे, डॉ. लक्ष्मीकांत कलंत्री, विजय मुकाडे, डॉ. नितिन कोष्टी, डॉ. श्रीकांत अमरशेट्टीवार, डॉ. संदीप कदम, वासुदेव चांदुरकर, मयूर ढोले, बाबुराव पाथ्रडकर, माजी आमदार नामदेव ससाणे, तातू देशमुख, राम देवसरकर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील वानखेडे यांनी केले, तर उद्धव गायकवाड यांनी आभार मानले.

## पुरस्काराचे मानकरी

■ स्व. भाऊसाहेब माने जीवनगौरव पुरस्कार, डॉ. महेंद्र भीमराव ढवळे (उपसंचालक, रेशीम संचालनालय, नागपूर),राज्यस्तरीय कृषी गौरव पुरस्कारार्थी : कृषी पर्यटन – पांडुरंग भगवानराव तावरे (सिगणी, बारामती), ऊस उत्पादक ते साखर उद्योजक – पांडुरंग साहेबराव आव्हाड (धाराशिव), अन्नप्रक्रिया उद्योग – कृष्णकुमार भवरलाल राठी (अकोला), दुग्ध उत्पादन – दिशा दिलीप उदगीरकर (अकोला, मुक्त संचार कुक्कुटपालन – अंकिता राजेंद्र मोरे पाटील (जालना), कृषी उद्योग – रविंद्र माणिकराव मेटकर (अमरावती), नैसर्गिक शेती – बाबाजी बांगर (पुणे), रेशीम व चॉकी सेंटर – अजिंक्य वसंत कांबळे (पुणे), दुग्ध उत्पादक – गोविंद पवार (नांदेड), सेंद्रिय भाजीपाला – श्रीपत राठोड (नागपूर), एकात्मिक शेती – कृष्णराव देसट्टीवार (यवतमाळ), ड्रोन तंत्रज्ञान – पूजा अमोल जिनेवाड (यवतमाळ), ‘समुराई’ ब्रँड – संतोष देशमुख (माजी सैनिक, अकोला), वनीकरण व वृक्षसंवर्धन – सुरेंद्र नारखेडे (अकोला), कृषी प्रसार (दैनिक) – तीक्ष्णत वाघमारे (संपादक, अजिंक्य भारत, मुंबई), कृषी प्रसार – संतोष मुंडे (सीनियर रिपोर्टर, सकाळ ॲग्रोवन), कृषी शास्त्रज्ञ – डॉ. मिलिंद पंजाबराव देशमुख (पुणे), हळद शास्त्रज्ञ – डॉ. मनोज माळी (सांगली), कृषी शास्त्रज्ञ – डॉ. नितीन कोंडे (अकोला), बियाणे तंत्रज्ञान – डॉ. आम्रपाली आखरे (अकोला), कृषी विस्तार – डॉ. किशोर बिडवे (अकोला) , आदर्श शेतकरी प्रोत्साहन पुरस्कार (उमरखेड तालुका): वंदना सदानंद पांडे (खरबी), दत्ता भीमराव वानखेडे, (सुकळी), सतीश दिगंबर जामकर (पोफाळी), समाधान वानखेडे यांना पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

सोमवार दि. २ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## तीर्थक्षेत्र शिरपूर ग्रामपंचायत मध्ये कायमस्वरूपी ग्रामपंचायत अधिकारी द्यावा!

**शिरपूर जैन:-** जिल्ह्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत म्हणून परिचित असलेल्या शिरपूर ग्रामपंचायत मध्ये मागील दोन वर्षापासून कायमस्वरूपी ग्रामपंचायत अधिकारी नसल्याने गावात समस्या वाढत आहेत. गावातील समस्याचे निराकरण करण्यासाठी शिरपूर ग्रामपंचायत मध्ये कायमस्वरूपी ग्रामपंचायत अधिकारी देण्यात यावा अशी मागणी होत आहे. जिल्ह्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत, तीर्थक्षेत्राचा दर्जा,मोठी बाजारपेठ, २० हजाराहून अधिक लोकसंख्या, उपबाजार तालुक्याच्या तोडीचे गाव म्हणून शिरपूर गावची ओळख आहे. मात्र मागील दोन वर्षापासून शिरपूर ग्रामपंचायत ला कायमस्वरूपी ग्रामपंचायत अधिकारी नसल्याने गावात विविध समस्या वाढत आहे आहेत. यामध्ये प्रामुख्याने स्वच्छता, नालीसफाई, काही रस्त्याची डागडुजी अशी कामे प्रभावीत झाली आहेत. अगोदरच पाच दिवसाचा आठवडा त्याचेच प्रभारी ग्रामपंचायत अधिकारी असल्याने ग्रामपंचायती संबंधित कामां मध्ये अडचणी येत आहेत. आता अवघ्या काही दिवसात सरपंच व सदस्य यांचा कार्यकाळ पूर्ण होणार आहे.

# अधिकारी व ठेकेदाराचे भ्रष्टधोरण, त्रास विनाकारण, शेतकऱ्याचे मरण!



* अखेर त्या पुलाच्या कामाची केंद्रीय ग्राम विकास मंत्रालयात तक्रार
* नुकसान भरपाईसाठी महसूलमंत्र्यांकडे मागितली दाद
* कोयाळी जाधव येथील गंभीर प्रकरण





ठेकेदाराची मुजोरी, अभियंत्याशी हातमिळवणी, गरिबाच्या शेतात पाणी! कोयाळी - नेतन्सा - डोणगावकडे जाणाऱ्या... रस्त्याचे चुकीचे काम, भ्रष्टाचारातून मिळाला दाम! अल्पभुधारक शेतकऱ्याचा टाहो, माझी ४८ गुंठे जमीन वाचवा हो! ठेकेदार जोमात, शेतकरी कोमात!



•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•

जिल्ह्यातील रिसोड तालुक्यात येत असलेल्या कोयाळी जाधव येथील गट नंबर ३९८ मधील ४९ गुंठे जमिनीच्या क्षेत्रात सबंधित कंत्राटदार व अभियंता यांनी संगनमताने एका निराधार महिला शेतकऱ्यावर अन्याय केला असल्याची तक्रार करण्यात आली आहे. येथील विधवा महिला अत्यल्पभूधारक शेतकरी श्रीमती दुर्गाबाई बबन जाधव यांनी आपल्यावर झालेल्या अन्यायाबाबत दाद मागण्यासाठी केंद्र सरकारच्या ग्राम विकास मंत्रालयाकडे व नुकसान भरपाई मिळावी म्हणून राज्याचे महसूल मंत्री नामदार चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम यांच्या मार्फत दि.२२ जानेवारी २०२६ रोजी कोयाळी जाधव येथील निराधार विधवा शेतकरी श्रीमती दुर्गाबाई बबन जाधव यांनी तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीत तक्रारदार यांनी म्हटले आहे की, त्यांचे पती स्व. बबन ग्यानबा जाधव यांचा दि.२८ नोव्हेंबर २०२५ रोजी मृत्यू झाला असून श्रीमती दुर्गाबाई व त्यांचा बेरोजगार मुलगा मोहन बबन जाधव हे निराधार झाले आहेत. त्यांच्याकडे वडिलोपार्जित गट नंबर ३९८ मध्ये केवळ ४९ गुंठे जमीन आहे. मात्र कोयाळी जाधव येथून नेतन्सा ते डोमगाव सीमेपर्यंत प्रधानमंत्री मंत्री ग्राम सडक योजनेचा रस्ता तयार करण्यात आला आहे. सदर रस्त्याचे कंत्राटदार पी. व्ही. जाधव आणि अभियंता संतोष चव्हाण यांनी संगनमत करून जाणीवपूर्वक आमचे कधीही भरून न निघणारे नुकसान केले आहे. तक्रारदार दुर्गाबाई बबन जाधव यांच्या तक्रारीनुसार सदर रस्त्याचे काम अंदाजपत्रकानुसार करण्यात आले नाही. शासकीय आराखड्याला बगल देऊन सबंधित रस्त्यावरील पूल व रस्ता जाणीवपूर्वक त्यांच्या ४९ क्षेत्रफळ असलेल्या जमिनीत वळविण्यात आला असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. परिणामी उपजिविकेसाठी नाममात्र असलेल्या जमिनीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शिवाय त्याच जमिनीजवळून वाहणाऱ्या नाल्यात अवैध खोदकाम करून कंत्राटदार जाधव यांनी रेती व माती उपसून नेली आहे. त्यामुळे यावर्षीच्या अतिवृष्टीत माझ्या जमिनीतील संपूर्ण पिक वाहून गेले आहे. परिणामी आमच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. या गंभीर प्रकाराबाबत याआधी प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेचे वाशिम येथील कार्यकारी अभियंता यांच्याकडे तक्रार केली होती. मात्र आमच्या तक्रारीला केराची टोपली दाखवली असल्याचा आरोप सुद्धा तक्रारदार श्रीमती दुर्गाबाई यांनी केला आहे. अखेर मी, व माझ्या कुटुंबावर झालेल्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी केंद्र सरकारच्या ग्राम विकास मंत्रालयाकडे व राज्याचे महसूल मंत्री नामदार चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे मला दाद मागावी लागली असल्याचे तक्रारदार यांनी म्हटले आहे.

सदर गंभीर तक्रारीची सखोल चौकशी करून दोषींवर योग्य ती कारवाई करण्यात यावी व मला नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी निराधार विधवा महिला शेतकरी श्रीमती दुर्गाबाई बबन जाधव यांनी केली आहे.

## थोडक्यात

### शबरी महामंडळातर्फे कर्ज योजनेसाठी ऑनलाइन अर्ज आमंत्रित

•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळातर्फे कर्ज योजनेसाठी ऑनलाइन अर्ज आमंत्रित आहेत. वाशिम जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठी ९ योजनांतर्गत कर्ज उपलब्ध आहे.

महिला सबलीकरण योजनेसाठी २ लाख रुपये, कृषी आणि संलग्न व्यवसायासाठी ५ लाख रुपये, हॉटेल ढाबा व्यवसायासाठी ५ लाख रुपये, ऑटो वर्कशॉप, स्पेअर पार्टसाठी ५ लाख रुपये, वाहन व्यवसायासाठी १० लाख व १०-१५ लाख रुपये, लघु उद्योग व्यवसायासाठी ३ लाख रुपये, ऑटो रिक्षा, मालवाहू रिक्षासाठी ३ लाख रुपये, स्वयम साहयता बचत गटासाठी ५ लाख रुपये इत्यादी योजना राबविण्यात येत आहे.

तरी या योजनेकरीता लाभार्थ्यांनी .ऱ्ग्ग्.ग्ह या वेबसाईड वर दि. २८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत ऑनलाईन अर्ज करण्यात यावे. तसेच काही अडचण असल्यास कार्यालयाच्या ९४२२९४५५१० किंवा ०७२३२-२५३१६९ या नंबरवर संपर्क साधावा असे शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळातर्फे आवाहन करण्यात आले आहे.

### गणेशपूर येथील प्रयोगशील शेतकरी सुरेश पाटील भोसले यांचे निधन

•सिटी न्युज ब्युरो @ रिसोड•

तालुक्यातील गणेशपूर/ पाचंबा येथील प्रयोगशील शेतकरी सुरेश संभाजी भोसले यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले आहे. त्यांच्या हस्तिविसर्जनाचा कार्यक्रम उद्या दि. ३ फेब्रुवारी मंगळवार रोजी होणार असल्याची माहिती भोसले कुटुंबियांनी दिली आहे.



गणेशपूर पाचंबा सेवा सहकारी सोसायटीचे माजी सदस्य असलेले स्व. सुरेश भोसले हे एक प्रयोगशील शेतकरी म्हणून संपूर्ण तालुक्यात सुपरिचित होते. त्यांचा सामाजिक कार्यात नेहमीच पुढाकार असायचा त्यामुळे गणेशपूर येथील ते एक प्रतिष्ठित व्यक्ती म्हणून ओळखले जात होते. मात्र एका अल्पशा आजाराने दि.३० जानेवारी रोजी त्यांचे दुःखद निधन झाले आहे. सुरेश भोसले यांच्या जाण्याने गाव एका धडाडीच्या सामाजिक कार्यकर्त्याला मुकला असल्याच्या भावना ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत.

त्यांच्या सावडण्याचा कार्यक्रम उद्या दि. ३ फेब्रुवारी मंगळवार रोजी पार पडणार आहे. स्व. सुरेश भोसले यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, भाऊ, भावजय, पुतणे असा बराच मोठा आप्त परिवार असून स्व. सुरेश भोसले यांच्या दुःखद निधनामुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

### मार्कशीट हरविली आहे

कु.बबिता विश्वनाथ कांबळे अशोक नगर, भिम चौक, शिवाजी पार्क ता.जिल्हा अकोला येथील रहिवाशी असून वाशीम येथे शिक्षण घेत आहे. शनिवार दि.११ जानेवारी २०२५ रोजी दुपारी १२.३० वा. वाशीम बसस्थानकावर जातेवेळेस माजी कृषी पदविका प्रथम वर्ष आणि दृतीय वर्षाची मार्कशीट हरविली आहे. भेटल्यास ९३२५८३८९४४ या क्रमांकावर संपर्क साधावा.

**दि.१३/९/२०२५** **सही**
**ठिकाण - वाशीम** **बबिता विश्वनाथ कांबळे**

## तातपूर्ती अतिक्रमण हटाव मोहिम...

## नगर पालिकेचा आला गाडा, गरिबांचे झोपडे मोडा...

# रस्त्यावरचे अर्धवट काढले, पक्के नाही पाडले!

•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•

### भेदभाव करू नका, रस्त्यावरचे काढा अन् पक्के पाडा

पाच दिवसापूर्वी नगर पालिकेच्या वतीने सिव्हील लाईन परिसरातील डॉ. देशमुख यांच्या दवाखाण्याजवळ अतिक्रमण हटाव मोहिम तातपूर्ती राबविण्यात आली. कायमस्वरूपी अतिक्रमण हटाव मोहिम राबवून रस्त्यावरील अतिक्रमण काढा मात्र श्रीमंतांचे पक्के अतिक्रमण पाडा अशी मागणी चेतन इंगोले यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे केली आहे.

वाशीम शहर अतिक्रमणामुळे व अस्वच्छतेमुळे भकास झाले आहे. शहरातील रस्त्यांना अतिक्रमणाने घेरले असून त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत होता. तर अस्वच्छतेने नागरिक त्रस्त झाले आहे. रस्त्यावरील अतिक्रमण हटाव मोहिमेनंतर कायम स्वरूपी शहरातील पक्के अतिक्रमण पाडण्याची मागणी शहर वासियांकडून होत आहे. अतिक्रमण हटाव मोहिम ही नेहमी सारखी न राबविता कायम स्वरूपी राबवावी. कारण हे अतिक्रमण धारक पुन्हा काही दिवसानंतर जैसे थे करीत पुन्हा अतिक्रमण करतात.



रस्त्यावरील अतिक्रमण न काढता पार्कींगच्या जागेवर केलेले पक्के अतिक्रमण, सरकारी जागेवर केलेले पक्के अतिक्रमण कायम स्वयंमस्वरूपी काढण्याची मागणी होत आहे. अतिक्रमण हटवितांना गरीब श्रीमंत असा भेदभाव न करता सरसगट पक्के अतिक्रमण पाडण्याचेही मागणी होत आहे.

निवेदन देताना यावेळी उपस्थित रवी खोटे, गणेश कांबळे, नितीन गाडेकर, प्रमोद गाडेकर, पठाण मामू, सुमनबाई अंभोरे, राधाबाई धवसे, चंद्रभागाबाई काळे, वैभव जंगले, प्रवीण पाटील, प्रशांत तायडे, दीपक पोरे, सुरेश आवटे, राहुल लबडे, सय्यद मोबिन, विठ्ठल जाधव, शिवा वाणी, श्रावण भालेराव, संतोष आठवले, सचिन खोटे, गणेश वाणी, मंगेश मापारी इतर भरपूर जण उपस्थित होते





### अनेक वेळा राबविण्यात येते अतिक्रमण हटाव मोहिम...

शहराला अतिक्रमणच्या विळाख्यातून बाहेर काढण्यासाठी अतिक्रमण हटाव मोहिम या पुर्वी ही अनेक वेळा राबविण्यात आली. मात्र अतिक्रमण हटविल्यानंतर काही दिवसातच पुन्हा जैसे थे परिस्थिती होते. अतिक्रमणामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. त्यामुळे कायम स्वरूपी अतिक्रमण हटाव मोहिम राबवून श्रीमंतांचे पक्के अतिक्रमण पाडण्याची मागणी होते.

## आज स्व.अजितदादा पवार यांचा अस्थिकलश वाशीम जिल्ह्यात!

### दर्शनाचा लाभ घेण्याचे चंद्रकांत ठाकरे यांचे आवाहन

•सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर•

आज २ फेब्रुवारी व उद्या ३ फेब्रुवारी रोजी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उप मुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांचा अस्थिकलश जिल्ह्यात दाखल होणार असून पवार यांच्या पवित्र अस्थिकलशाचे दर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत ठाकरे यांनी केले आहे.



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या पवित्र अस्थिचे वाशिम जिल्ह्यामध्ये सर्व तालुक्याच्या ठिकाणी ठेवण्यात येणार आहेत.तसेच अस्थिचे विसर्जन प्रसिद्ध 'तीर्थ चाका तीर्थ 'येथील काटेपूर्णा नदीच्या तीरावरती विसर्जित करण्याचा कार्यक्रम वाशिम जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने आयोजित केला आहे.अस्थिकलश दिनांक २ रोजी सोमवारी दुपारी ३ वाजता झाशी राणी चौक ,कारंजा लाड , सायंकाळी ५ वाजता शिवाजी महाराज चौक, मानोरा येथे ठेवण्यात येणार असून मंगरुळपिर येथे मुक्काम राहणार आहे.दिनांक:- ०३ मंगळवार रोजी सकाळी ९ वाजता बिरबलनाथ मंदिर चौक मंगरुळपिर ११ वाजता पाटणी चौक, वाशिम दुपारी १ वाजता शिवाजी चौक रिसोड, दुपारी ३ वाजता जुने बस स्टॉप चौक मालेगाव येथे अस्थिकलश ठेवण्यात येणार असून दुपारी ४ वाजता चाकातीर्थ डव्हा येथे अस्थी विसर्जन कार्यक्रम होणार आहे.या अस्थिकलशाचे दर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत ठाकरे यांनी केले आहे.

## लोकनेते अजितदादांना सर्वपक्षीय श्रध्दांजली !

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•

लोकनेते उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे अपघाती निधन झाले. महाराष्ट्राने लोकप्रिय लोकनेता विकास पुरुष गमावला असून त्यांना रविवार १ फेब्रुवारी रोजी सर्वपक्षीय सर्वसंघटनेच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.



अजितदादा पवार यांच्या आठवणीला उजाळा

श्रद्धांजली सभेचे अध्यक्षस्थानी बाबाराव खडसे पाटील होते, सभेला माजी मंत्री सुभाषराव ठाकरे, आ. शाम खोडे, आि. किरणराव सरनाईक, आ. भावनाताई गवळी, राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हा अध्यक्ष चंद्रकांत ठाकरे, उबाठा जिल्हा प्रमुख सुरेश मापारी, शिवसेना जिल्हा प्रमुख विजय खानझोडे, नगराध्यक्ष अनील केंदळे, वंचीतच्या किरणताई गिन्हे, ज्योती गणेशपूरे, दिलीप जाधव, अविनाश वानखेडे, महानंदचे वामनराव देशमुख, दिलीपराव सरनाईक, राजु भांबुर्गे, रवी भांबुर्गे, तेजराव वानखेडे, निलेश सोमानी, जुगलकीशोर कोठारी, गजानन देशमुख वडजीकर, डॉ सुधीर कव्हर पुरणमल बदलानी, वैशालीताई खोब्रागडे, सलमानभाई लाला, सरपंच संघटनेचे शरद गोदारा, सुभाष बोरकर, गजानन खंडारे, गजानन भोयर, ॲड तीफने, हभप ज्ञानेश्वर सरकटे महाराज, संजय मापारी, दिपक खडसे, सुर्यप्रकाश दहात्रे, संदीप दहात्रे, गोविंद वर्मा, पवन राउत, महादेव काकडे गुरूजी, गजानन हजारे, राहुल तुपसांडे, शंकर वानखेडे, प्रकाश महाले, गजानन शींदे, दयाराम गव्हाने, गीरधारीलाल सारडा, शीवशंकर भोयर, गणेश खंडाळकर, कविता खरात, विजयराव जाधव, नीतीन मडके, नवघरे, कृष्णा राठोड, राजु किडसे, उज्वल देशमुख, राजेश शीरसाट, यासमीन शेख, अनील रंधवे, समवेत विविध पक्ष संघटना, पदाधिकारी, कार्यकर्ते, समाजसेवक मोठ्या संख्येने उपस्थीत होते. यावेळी माजी मंत्री सुभाषराव ठाकरे, राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष चंद्रकांत ठाकरे, आ. शाम खोडे, बाबाराव खडसे पाटील आ. सरनाईक, ज्योती गणेशपुरे, राजु चौधरी, नगराध्यक्ष अनील केंदळे, सुरेश मापारी, डॉ सुधीर कव्हर, दिलीपराव सरनाईक, राजेश सीरसाठ, समवेत मान्यवरांनी आपल्या विचारातुन उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जिवनकार्यावर प्रकाश टाकला.

त्यानंतर अजितदादांना सर्वपक्षीय श्रद्धांजली अर्पन करण्यात आली. श्रद्धांजली शोकसभेचे संचालन माजी सरपंच दिपक खडसे, पवन राउत, तर श्रद्धांजली सभेचे संचालन निलेश सोमानी यांनी केले.

## अर्धवट काम मोक्यात, जीवन धोक्यात !

### धोकादायक पुलाचे काम पुर्ण, कठड्याचे काम अपूर्ण * जालना - पुलगाव महामार्गावरील प्रकार

•प्रभाकर नाईकवाडे @ रिसोड•

जालना–पुलगाव राष्ट्रीय महामार्गावरील रिसोड तालुक्यातील पिंपरी सरहद्द गावाजवळील खारोळ नाल्यावरील धोकादायक व खसलेला पूल सिटी न्यूज सुपरफास्टच्या सातत्यपूर्ण वृत्तमालिकेनंतर अखेर दुरुस्त करण्यात आला आहे. गेल्या चार वर्षापासून पुलाचा साईड भाग कोसळलेला असल्याने वाहनचालक व शेतकऱ्यांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत होता.



या पुलाबाबत सिटी न्यूज सुपरफास्टने एक नव्हे तर अनेक वेळा बातम्या प्रसिद्ध करून प्रशासनाचे लक्ष वेधले होते. त्यानंतर राष्ट्रीय महामार्ग विभागाने दखल घेत पुलाचे काम पूर्ण केले. त्यामुळे वाहतूक पूर्ववत सुरू झाली असून स्थानिक नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला आहे.मात्र पुलाचे काम झाले असले तरी या पुलावर अद्याप सुरक्षा कठडे (रेलिंग) व दिशा–सूचना फलक बसवण्यात आलेले नाहीत. त्यामुळे वाहनधारकांना आजही धोकादायक परिस्थितीतूनच प्रवास करावा लागत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी कमी प्रकाश, अरुंद पूल आणि कठड्यांचा अभाव यामुळे अपघाताचा धोका अधिक वाढतो.महत्त्वाचे म्हणजे, पुलाच्या दोन्ही साईडला कठडे नसल्यामुळे अंदाजे १० ते १५ फूट खोल उतार आहे. अशा परिस्थितीत वाहन थोडेसे जरी घसरले तरी थेट खोल नाल्यात कोसळण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही. पावसाळ्यात खारोळ नाल्याला मोठ्या प्रमाणात पूर येतो आणि रस्ता ओलसर झाल्याने अपघाताचा धोका आणखी वाढतो. या ठिकाणी कोणतेही दिशा दर्शविणारे फलक, सावधानता सूचना किंवा वेगमर्यादा दर्शक बोर्ड नसल्यामुळे बाहेरगावाहून येणाऱ्या वाहनधारकांना पुलाच्या धोक्याची कल्पनाही येत नाही.या मार्गावरून दुचाकी, चारचाकी तसेच शेतकरी मोठ्या प्रमाणात नियमित ये–जा करतात. त्यामुळे फक्त पूल दुरुस्त करणे





पुरेसे नसून, कठडे व दिशा–सूचना फलक बसविल्याशिवाय ही दुरुस्ती अपूर्ण असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. प्रशासनाने तातडीने पुलावर सुरक्षा कठडे व आवश्यक सूचना फलक बसवून वाहनधारकांची सुरक्षितता सुनिश्चित करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

## शिरपूर येथील चतुर्मुख मंदिराचा वार्षिकोत्सव उत्साहात

•सिटी न्युज ब्युरो @ शिरपूर•

जगप्रसिद्ध असलेल्या श्री अंतरिक्ष पार्श्वनाथ महातीर्थ येथील नूतन चतुरमुख जैन मंदिराचा तृतीय वार्षिकोत्सव भाविकांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी ध्वजारोहणा लाभ घेणाऱ्या लाभार्थी परिवाराच्या हस्ते मंदिराच्या शिखरावर धार्मिक विधीसह मंत्रोच्चारात ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी आचार्यश्री विमलहंस सुरिश्वरजी महाराज यांच्यासह अन्य साधु मुनीराज व साधविवृंद यांची उपस्थिती होती. कार्यक्रमासाठी शेकडोच्या संख्येने श्वेतांबर जैन समाज बांधव उपस्थित होते.



या मंदिरात श्री ऋषभदेव भगवान, श्री संभवनाथ भगवान, श्री विमलनाथ भगवान व श्री महावीर स्वामी या तीर्थकारांच्या मूर्तींची सन २०२३ साली प्रतिष्ठापना करण्यात आलेली आहे.सुरत येथील विधीकारांनी सतरभेदी पूजा व अभिषेक पूजन केल्यानंतर मंदिराच्या शिखरावर ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी आचार्यश्री विमलहंस सुरिश्वरजी महाराज, मुनीराज राजहंस विजयजी मुनीराज रत्नवल्लभ विजयजी महाराज आदींची उपस्थिती होती.कार्यक्रमात श्री अंतरिक्षी पार्श्वनाथ संस्थानचे मॅनेजिंग ट्रस्टी दिलीप शाह, उपाध्यक्ष डॉ.संतोष संचेती, विश्वस्त अभय शाह, मुकेश कोरडीया, पारसमल गोलेच्छा, किशोर सोनी, प्रकाशचंद सोनी, वैभव शाह, मनीष संचेती, हसमुख शाह यांच्यासह इतर विश्वस्त मंडळींची उपस्थिती होती.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

सोमवार, दि. २ फेब्रुवारी २०२६

http://epaper.citynewssuperfast.com


# म्युन्सिपल बॉन्ड मुळे उजळणार का कॉटन नगरीचे भाग्य ?

प्रतिनिधी २ फेब्रुवारी

**अकोला :** आर्थिक फंडाची कमी असल्याने महापालिकांना आर्थिक दृष्ट्या सुदृढ आणि आत्मनिर्भर बनवण्यासाठी केंद्रीय अर्थ मंत्री निर्मला सीता रमण यांनी बजेटमध्ये ठोस तयारी केली आहे. शहरी विकासाला गती देण्यासाठी महानगरपालिका रोख्यांद्वारे संसाधने उभारण्यावर भर दिला आहे. या तरतुदी अंतर्गत १००० कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या सिंगल बॉण्ड प्रकल्पासाठी १०० कोटी रुपयांचे प्रोत्साहन जाहीर करण्यात आले आहे. या घोषणेचा उद्देश शहरी पेयजल आणि सांडपाणी पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये खाजगी गुंतवणूक आकर्षित करणे तसेच अमृत दोन योजनेअंतर्गत महानगरपालिकांना आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी बनवणे आहे. त्याकरिता अकोला महापालिकेला आधी क्रेडिट रेटिंग प्रक्रिया पूर्ण करावी लागेल. राज्य सरकारकडून औपचारिक मान्यता मिळाल्यानंतर सेबीकडे नोंदणी करावी लागेल. या आधी महानगरपालिकेच्या बॉन्ड ची सुरुवात राज्यात सर्वात आधी नाशिक महानगरपालिका त्यानंतर नागपूर महापालिकेने केली होती. परंतु दोन्हीही ठिकाणी एक कोटी रुपयाहून अधिक निधी जमविता आला नाही. त्यामुळे अकोला महानगरपालिका या बॉन्ड मार्फत निधी जमविण्यात किती प्रमाणात यश मिळवेल याबद्दल साशंकता निर्माण होत आहे. जर हा निधी गोळा करण्यात महापालिकेला यश आले तर शहरातील मोर्णा नदी स्वच्छतेचा प्रश्न तसेच मल निस्सारणाचा प्रश्न तसेच असद गड किल्ल्याची दुरुस्ती व शहराच्या सौंदर्यकरणाचा प्रश्न सुटण्यास मोठी मदत मिळू शकेल. याआधीही मोरणा नदीच्या साफसफाईसाठी अनेकदा मोहिमा राबविण्यात आले आहेत मोर्णा नदीला गुजरात मधील साबरमती नदीसारखे बनविण्याचे आश्वासन स्थानिक राजकारण्यांनी वारंवार दिली आहे त्यामुळे आता सत्ता सांभाळण्याची जबाबदारी त्यांच्याकडे झाल्याने तसेच केंद्रात व राज्यात भाजपाचे सरकार असल्याने अकोला शहराच्या विकासाला गती देण्यासाठी अर्थमंत्र्यांनी महानगरपालिका रोख्यां द्वारे निधी उभारण्यावर जो भर दिला आहे त्यामध्ये सत्ताधारी भाजपाचे पदाधिकारी कितपत यशस्वी ठरतात हे बघणे उचित राहणार आहे



# सकल हिंदू समाजाचा विशाल मोर्चा

## ♦ नवनाथांची विटंबना करणाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी

प्रतिनिधी २ फेब्रुवारी

**अकोला :** शेगाव तहसील अंतर्गत येणाऱ्या हिंगणा वैजनाथ गावातील नवनाथ महाराजांच्या मूर्तींची विटंबना करणाऱ्यां समाजकंटकांवर कठोर कारवाई करण्यात यावी या मागणीच घेऊन आज सोमवारी युवा नाथ संघटन व सकल हिंदू समाजाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर काढण्यात आला शेगाव तहसील अंतर्गत येणाऱ्या हिंगणा वैजनाथ येथे नाथ संप्रदायाच्या तसेच वारकरी संप्रदायाचे श्रद्धास्थान असलेल्या श्री नवनाथ महाराजांच्या मूर्तींची अज्ञात समाजकंटकाने तोडफोड करीत विटंबना करण्याची घटना समोर आली आहे

या घटनेमुळे संपूर्ण जिल्ह्यात नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे या घटनेचा निषेध करण्यासाठी व दोषी समाजकंटकांवर कठोर कारवाई करण्यात यावी या मागणीच घेऊन सकल हिंदू समाज व युवा नाथ संघटनेतर्फे जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला शहराचे आराध्य दैवत श्री राज राजेश्वर मंदिरापासून हा मोर्चा सुरू झाला जय हिंद चौक महाराणा प्रताप चौक सिटी कोतवाली तहसील कार्यालय होत हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर पोहोचला त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांना सकल हिंदू समाजातर्फे समाजकंटकांवर कठोर कारवाई करण्याचे निवेदन देण्यात आले या मोर्चामध्ये नाथ समाज सनातन हिंदू समाज तसेच इतर हिंदुत्ववादी संघटनाचे कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी कुठलाही अनुचित प्रकार घडू नये याकरिता पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता

# खुटपुरी, घाटपुरी, शिरजगाव शेतशिवारात बिबट्याचा वावर

प्रतिनिधी २ फेब्रुवारी

**खामगाव :** तालुक्यातील शिरजगाव देशमुख, खुटपुरी व घाटपुरी शेतशिवारात बिबट्याचा वावर आढळून आल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आह मागील काही दिवसांपासून विशेषतः रात्रीच्या वेळी बिबट्याचा वावर वाढल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. सकाळच्या सुमारास शेतात गेलेल्या नागरिकांना बिबट्याच्या पायांचे ठसे दिसून आले असून, काही ठिकाणी जनावरांवर हल्ल्याच्या घटना घडल्याची

माहिती समोर आली आहे. त्यामुळे शेतकरी, शेतमजूर तसेच शेतात जाणाऱ्या महिला व लहान मुलांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. या परिसरात ऊस, हरभरा, गहू आदी पिकांची मोठ्या प्रमाणावर लागवड असून, दाट पिकांमुळे बिबट्याला लपण्यासाठी अनुकूल वातावरण मिळत असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. नागरिकांनी रात्रीच्या वेळी एकटे शेतात जाणे टाळावे, तसेच समूहानेच शेतीची कामे करावीत, असे आवाहन ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. बिबट्याची माहिती वनविभागाला देण्यात आली असून, खुटपुरी शिवारामध्ये रात्रीच्या वेळी खामगाव येथील वनविभागाची पथकाने दाखल होऊन पाहणी केली आहे.

# एसपी कार्यालयात तोतया आयबी अधिकाऱ्यामुळे खळबळ

## ♦ मंगळवार पर्यंत दिली पोलिस कोठडी

प्रतिनिधी २ फेब्रुवारी

**अकोला :** पोलिस अधीक्षक कार्यालयात एका कथित आयबी अधिकाऱ्याच्या आगमनाने खळबळ उडाली. प्राप्त माहितीनुसार, एका व्यक्तीने सायबर क्राईम विभागात जाऊन आपली ओळख 'मी भोपाळ येथे आयबी अधिकारी आहे' अशी करून दिली. रविवारी सायंकाळी हा प्रकार घडला.

संबंधित व्यक्तीने सायबर विभागातील कर्मचाऱ्यांना सांगितले की, 'मी आताच पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांची भेटून आलो आहे. भोपाळमधील एका केसच्या तपासासाठी मी इथे आलो असून, हा मोबाईल मला अनलॉक करून हवा आहे.'

सायबर सेलच्या पोलिसांना त्या व्यक्तीच्या बोलण्याचा संशय आला. त्यांनी तातडीने एसपी अर्चित चांडक यांच्याशी संपर्क साधला. एसपी चांडक यांनी स्पष्ट केले की, 'अशा कोणत्याही व्यक्तीची मी भेट घेतलेली नाही आणि कुणालाही सायबर विभागात पाठवलेले नाही.' संशय बळावल्याने एसपी चांडक यांनी अप्पर पोलीस अधीक्षक रेड्डी यांना तातडीने घटनास्थळी पाठवले. पोलिसांनी सतर्कता दाखवत सखोल चौकशी केली असता, तो तरुण बनावट आयबी अधिकारी असल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी पोलिसांनी जळगाव येथील डॉ. विश्वरेत विश्वनाथ पाटील याला अटक केली आहे. रविवारी त्याला न्यायालयात हजर केले असता, न्यायाधीशांनी आरोपीला ३ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

# मुस्लिम वस्तीत सोयी सुविधा द्या : महापौरांच्या सूचना

प्रतिनिधी २ फेब्रुवारी

**अकोला :** मुस्लिम समाजाचा महत्त्वाचा सण ३ फेब्रुवारी रोजी असून, शहरातील साफसफाई, पथदिवेसंदर्भात तसेच विशेष लाइटची व्यवस्था मुस्लिम वस्तीमध्ये करण्यात यावी, अशा सूचना महापौर शारदा खेडकर यांनी दिल्या.

अकोला शहरातील प्रत्येक नागरिकाच्या सणवार तसेच उत्सव लक्षात घेता मनपा प्रशासनाने दखल घ्यावी. सामाजिक दायित्व म्हणून व नागरिकांना सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने विशेष लक्ष द्यावे, अशाही सूचना त्यांनी दिल्या. आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे, विजय अग्रवाल, जयंत मसने, राष्ट्रवादी अजित पवार पक्षाचे महानगर अध्यक्ष विजय देशमुख, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार कॉँग्रेसचे नेते रफिक सिद्दिकी तसेच जावेद जकेरिया यांनी यासंदर्भात लक्ष देण्याचे निर्देश दिले होते.

# नाईक होमिओपॅथी येथे अनेक असाध्य आजारावर उपचार केले जातात

## ♦ ॲडव्हान्स होमिओपॅथी उपचार रुग्णांसाठी गुणकारी

प्रतिनिधी २ फेब्रुवारी

**अकोला :** येथील नाईक होमिओपॅथी मध्ये थॉयरॉईड , लठ्ठपणा, ॲसीडीटी, गुडघेदुखी, कंबरदुखी, संधीवात, मायग्रेन, पिसीओडी सारख्या असाध्य आजारावर उपचार करून रूग्णांना पुन्हा जीवन प्रवाहात आणण्याचे कौशल्य आहे. ॲडव्हॉन्स होमिओपॅथीच्या उपचाराने आजमितीस हजारो रूग्णांनी त्याचा लाभ घेतलेला आहे.




गेल्या ४० वर्षापासून नाईक होमिओपॅथी येथे शरीराच्या सर्व आजारावर सर्वांगीण यशस्वी उपचार केले जात आहेत. ज्या रूग्णांना कुठेही फायदा झाला नाही. अश्या रूग्णांनी एकदा अवश्य भेट द्यावी

अधिक माहिती मोबाईल क्र. ९१७५९५७१२९, ९१३०० १६१२९ व Naikhomoeopathy.com (Youtube) वर माहिती घ्यावी. रुग्णांनी अनुभव कथन केले. माझे नांव पायल नाईक होमिओपॅथी येथे येण्या अगोदर माझे वजन खुप वाढले होते. नाईक होमिओपॅथी येथे १ महिना उपचार केल्यानंतर माझे ५ किलो २०० गॅम वजन कमी झाले. नाईक होमिओपॅथी उपचारने मला चांगला फायदा झाला. मी समाधानी आहे.

# केंद्रीय अर्थसंकल्पाचे स्वागत, तर काहींचा विरोध

### अर्थसंकल्पातील 'विकसित भारत' केवळ संकल्प नसून कोट्यवधी कामगार, सामान्यांच्या प्रगतीचा मार्ग - ॲड. आकाश फुंडकर

**अकोला:** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील



सरकारने १२ वर्षांपासून सुरू ठेवलेल्या नियोजनबद्ध विकासामुळे भारताची अर्थव्यवस्था जगासाठी आशेचा किरण ठरली आहे. केंद्रीय वित्त मंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेला अर्थसंकल्प केवळ आकड्यांचा खेळ नसून, तो देशातील गरीब, शेतकरी आणि कष्टकरी कामगारांचे जीवनमान उंचावणारा ठरणारा आहे, अशी भावना राज्याचे कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी व्यक्त केली. फुंडकर म्हणाले, राज्यातील पायाभूत सोयी सुविधांसाठी अर्थसंकल्पात दिलेल्या भरीव निधीमुळे राज्यातील 'इन्फ्रास्ट्रक्चर' जागतिक स्तराचे होण्यास मदत मिळणार आहे. देशांतर्गत उत्पादनावर दिलेला भर आणि सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठी केलेली १० हजार कोटी रुपयांची भरीव तरतूद ही देशातील औद्योगिक क्रांतीला नवी दिशा देणारी आहे. वस्त्रोद्योग क्लस्टरच्या विकासामुळे आणि खनिज कॉरिडॉरमुळे मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील, ज्याचा सर्वाधिक फायदा तरुण कामगार वर्गाला होईल. सामान्य नागरिकांसाठी सरकारने कॅन्सर आणि मधुमेहाची औषधे स्वस्त करण्याचा घेतलेला निर्णय दिलासादायक आहे. तसेच, बायोफार्मा उत्पादनासाठी १० हजार कोटींची तरतूद करून भारताला या क्षेत्राचे जागतिक 'हब' बनवण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. यामुळे आरोग्य सुविधा अधिक सक्षम आणि परवडणाऱ्या होतील, असेही कामगार मंत्री यांनी नमूद केले आहे. ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या खादी आणि हातमाग क्षेत्रासाठी 'महात्मा गांधी ग्रामस्वराज' अभियान ही क्रांती असल्याचे सांगत कामगार मंत्री म्हणाले, हातमाग उत्पादनात वाढ झाल्यामुळे ग्रामीण कारागिरांच्या कौशल्याला जागतिक बाजारपेठ मिळेल आणि त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढण्यास मदत होईल. कृषी क्षेत्रात उत्पादकता वाढवण्यावर दिलेला भर आणि ४ राज्यांमध्ये प्रस्तावित असलेले खनिज कॉरिडॉर हे भारताच्या सर्वांगीण विकासाचे निदर्शक आहेत. आर्थिक विकास दरात सातत्याने वाढ करणे हे आमचे पहिले कर्तव्य असून सरकार त्या दृष्टीने ठोस पावले उचलत आहे.

### इज़ ऑफ डुइंग बिझनेस साठी लोकप्रतिनिधींनी व्यापा-यांसोबत उभे राहावे : सुनील इन्नानी

**अकोला :** राज्यात इज ऑफ डुइंग बिझनेस संकल्पनेला मुख्यमंत्री देवेंद्र



फडणवीस महत्त्व देतात परंतु त्यासाठी लोकप्रतिनिधींनी व्यापारी, उद्योजक यांच्या सोबत उभे राहिले पाहिजे. कारण भ्रष्टाचारी यंत्रणा झारीतील शुक्राचार्य बनून अडथळे आणत असते असे स्पष्ट मत बिल्डर सुनील इन्नानी यांनी केंद्रीय अर्थसंकल्पा बाबतीत व्यक्त केले. व्यापार, व्यवसाय करताना आजही पंचवीस तीस प्रकारच्या परवानगी लागतात. आणि भ्रष्टाचार इतका बोकाळला आहे की त्यामुळे व्यापारी, उद्योजकांवर आर्थिक बोजा पडतो. अशा वेळी लोकप्रतिनिधींनी व्यापारी, उद्योजकांच्या पाठीशी उभे राहणे आवश्यक आहे. नाही तर बजेट येतील आणि जातील. तसेच उद्योगातून रोजगार निर्मिती स्वप्न पूर्ण होणे कठीण होईल अशी भीती सुनील इन्नानी यांनी आर आर सी नेटवर्कशी बोलताना व्यक्त केली.

### रथसंकल्पामुळे गुंतवणूक, रोजगार निर्‍मितीला चालना : ब्रिजमोहन चितलांगे

**अकोला :** केंद्रीय अर्थसंकल्पात उत्पादन, कृषी-आधारित उद्योग आणि कृत्रिम



बुद्धिमत्ता यावर दिलेला भर गुंतवणूक, आणि रोजगाराला मोठी चालना देईल असा विश्वास गुजरात अंबुजा एक्सपोर्‍ट लि. चे अध्यक्ष (ऑपरेशन) ब्रिजमोहन चितलांगे यांनी व्यक्त केला. वैयक्तिक आयकरावर कोणताही अतिरिक्त बोजा न पडल्यामुळे उपभोग आणि मागणीला अधिक बळकटी मिळेल. तसेच हा अर्‍थसंकल्प उद्योग, विकास आणि आत्मनिर्‍भर भारतासाठी एक सकारात्मक संकेत असल्याचे ब्रिजमोहन चितलांगे यांनी म्हटले आहे.

### अर्थसंकल्प संतुलित व व्यवहार्य : निकेश गुप्ता

**अकोला :** अर्थसंकल्प २०२६ एकूणच संतुलित व व्यवहार्य असून आर्थिक स्थैर्य राखत विकासाला चालना देण्याचा प्रयत्न दिसतो असे विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज अकोलाचे अध्यक्ष निकेश गुप्ता यांनी म्हटले



आहे. या अर्थसंकल्पामुळे लघु उद्योग, मॅन्युफॅक्चरिंग, पायाभूत सुविधा, निर्यात, सेवा क्षेत्र व लॉजिस्टिक्स यांना लाभ होईल. सुलभ पेमेंट व्यवस्था, करप्रक्रियांचे सुलभीकरण आणि सरकारी भांडवली गुंतवणुकीमुळे व्यापार-उद्योगांना दिलासा मिळेल व रोजगाराच्या संधी वाढतील. टियर-२ व टियर-३ शहरांवर दिलेल्या भरामुळे पश्चिम विदर्भातील दुर्लक्षित जिल्ह्यांनाही अप्रत्यक्ष लाभ मिळण्याची शक्यता आहे. मात्र थेट करांमध्ये अधिक सवलत, विशेषतः मध्यमवर्ग व लघु व्यापाऱ्यांसाठी, अपेक्षित होती, ज्यामुळे खप आणि बाजारपेठेला गती मिळाली असती. तसेच या जिल्ह्यांसाठी विशेष औद्योगिक पॅकेज व अ?ग्रो-फूड प्रोसेसिंग क्लस्टर्सची गरज अधोरेखित होते. एकूणच हा अर्थसंकल्प योग्य दिशेने असून, विदर्भाच्या जलद व संतुलित विकासासाठी शासन पुढील काळात ठोस व क्षेत्रनिहाय पावले उचलेल, अशी अपेक्षा निकेश गुप्ता यांनी व्यक्त केली.

### अर्थसंकल्प देशाच्या भविष्यास दिशा देणारा : जावेद जकरिया

**अकोला :** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी संसदेत सादर केलेला



अर्थसंकल्प देशातील गाव, गरीब, शेतकरी आणि युवकांचे भविष्य लक्षात घेऊन तयार केलेला सकारात्मक व दूरदृष्टीपूर्ण अर्थसंकल्प आहे. शेती व संलग्न क्षेत्रांसाठी १,६२,६७१ कोटी तसेच ग्रामीण विकासासाठी २,७३,१०८ कोटींची तरतूद करून सरकारने गावांना विकासाचा मुख्य आधारस्तंभ बनवण्याच्या दिशेने ठोस पावले उचलली आहेत, हे स्पष्ट केले आहे. शेतकऱ्यांना आत्मनिर्भर बनवणे, शेतीचा सर्वांगीण विकास करणे आणि ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी करण्यात आलेल्या तरतुदी निश्चितच कौतुकास्पद आहेत. तसेच उच्च शिक्षणासाठी, एसटीईएम संस्थांमध्ये मुलींसाठी प्रत्येक जिल्ह्यात वसतिगृहांची उभारणी, १५,००० माध्यमिक शाळा व ५०० महाविद्यालयांमध्ये कंटेंट क्रिएटर लॅब्सची स्थापना, ७ हायस्पीड रेल्वे कॉरिडॉर, तसेच अत्यावश्यक औषधांवर सीमाशुल्कात सूट देण्यासारखे निर्णय देशाच्या प्रगतीला नवी गती देतील. हा अर्थसंकल्प केवळ सध्याच्या गरजा पूर्ण करणारा नसून, देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी भक्कम पाया घालणारा आहे. एकूणच हा अर्थसंकल्प भारताला विकास, आत्मनिर्भरता आणि सर्वसमावेशक प्रगतीच्या दिशेने नेणारा एक चांगला व संतुलित अर्थसंकल्प आहे असे राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार)हप्रदेश संघटक सचिव ,जावेद जकरिया यांनी म्हटले आहे.

### केंद्रीय अर्थसंकल्प कामगार कर्मचा-यांच्या प्रश्नांपासून पूर्णपणे तुटलेला : नयन गायकवाड

**अकोला :** केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ हा अंगणवाडी, आशा, शालेय पोषण



कर्मचारी, कामगार, पेन्शन व सामान्य जनतेच्या जीवनाशी निगडित प्रश्नांपासून पूर्णपणे तुटलेला आहे. देशासमोर उभ्या असलेल्या वास्तविक आर्थिक संकटाला सामोरे जाण्यास सरकार अपयशी ठरल्याची तीव्र टीका भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नयन गायकवाड यांनी केली आहे. जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

### बजेटमध्ये दिव्यांगांसाठी सकारात्मक बाबींचा समावेश : डॉ विशाल कोरडे

**अकोला :** अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी अर्थसंकल्प सादर केला.



दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोलाचे संस्थापक अध्यक्ष डॉ.विशाल कोरडे यांनी अर्थसंकल्पात दिव्यांग बांधवांसाठी घोषित केलेल्या योजनांचे स्वागत केले आहे. दिव्यांग कौशल योजना, दिव्यांग सहारा योजना व प्रधानमंत्री दिव्यांग केंद्राला सहयोग अशा महत्त्वपूर्ण बाबी या अर्थसंकल्पात मांडल्या आहेत त्याचे स्वागत केले आहे.

# संत शिरोमणी रोहिदास महाराज जयंतीनिमित्त खामगावात शोभायात्रा



प्रतिनिधी २ फेब्रुवारी

**खामगाव :** संत रोहिदास महाराजांच्या जयंतीनिमित्त १ फेब्रुवारी रोजी शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त शहरातून शोभायात्रा काढण्यात आली.

शोभा यात्रेला सकाळी चांदमारी भागातून प्रारंभ झाला. टाळ मृदंगाच्या गजरात निघालेली ही शोभायात्रा कृषी उत्पन्न बाजार समिती रोड, टिळक पुतळा, केडिया टर्निंग, मेन रोड, फरशी, टॉवर चौक, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, बसस्थानक, शर्मा टर्निंग, विकमसी चौक या मार्गाने पुन्हा चांदमारीत समारोप झाला. या शोभायात्रेमध्ये महिलांचा लक्षणीय सहभाग दिसून आला. यात्रेच्या शेवटी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

# अतिक्रमणांमुळे वाहतूक कोंडीत भर !

प्रतिनिधी २ फेब्रुवारी

**अकोला :** शहरातील प्रमुख चौक व रस्त्यांवर वाढलेल्या अतिक्रमणांमुळे वाहतूक विस्कळीत झाली आहे. स्थानिक नागरिक त्यामुळे त्रस्त झाले आहेत. रहदारीचे रस्ते अडथळे मुक्त असावे अशी मागणी केली जात आहे.

काही अस्थायी विक्रेत्यांनी तर मुख्य रस्त्यावर ठिय्या मांडला आहे. याकडे महापालिका अतिक्रमण विरोधी पथकाचे दुर्लक्ष दिसते. जनतेला होत असलेला त्रास तातडीने दू करण्यात यावा अशी मागणी आहे.


CLASSIFIED






हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012 /49642, RRC Helpline No. 8484842135